# प्रकरण - पाच

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

# प्रकरण - ५ वे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

५·१ प्रास्ताविक

५·२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती

५·३ पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये

५·४ पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संक्रमण

५·५ पाठांतील मूल्यांचे संक्रमित होण्याचे प्रमाण

५·६ मूल्यसंक्रमणातील अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे महत्व

५·७ मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांनी सहभाग घेतलेल्या कृतिसत्र / शिबिराची माहिती·

५·८ मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन

५·९ प्रस्तुत संशोधनासंबंधी अन्य उपयुक्त माहिती

५·१० समारोप

=0=0=0=0=0=

# प्रकरण - ५ वे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

### ५·१ प्रास्ताविक :

प्रकरण दोन, तीन व चार मधून प्रस्तुत संशोधनाला अनुकूल ठरेल अशी माहिती दिलेली आहे· या प्रकरणामधून मूल्ये, अर्थ व त्याचे अध्यापन, व्याप्ती, मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान, मूल्य संक्रमणाचा अर्थ, मूल्य संक्रमणात शिक्षक आणि शिक्षणाची भूमिका, यासंबंधी विचार मांडलेले आहेत· प्रकरण चारमधून इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठी " बालभारती " पाठ्यपुस्तकामधील मूल्यांचा शोध घेवून त्यासंबंधी चर्चा केलेली आहे· या तीन प्रकरणामधून संशोधनास उपयुक्त अशी सैद्धांतिक पार्श्वभूमी तयार केली आहे·

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करून त्याचा अन्वयार्थ लावणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे·

अभ्यासकाने संशोधनासाठी कोल्हापूर शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील उच्च प्राथमिक शाळा निवडलेल्या होत्या, कोल्हापूर महानगर - पालिका क्षेत्रामध्ये म्युन्सिपलच्या अखत्यारामधील ७२ शाळा आहेत· तर अनुदानप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा ६५ आहेत· ६ शाळा विना-अनुदानित मराठी शाळा आहेत· अशा एकूण १४३ मराठी व माध्यमाच्या प्राथमिक शाळा आहेत· १४३ शाळापैकी ६२ शाळामध्ये इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंतचे वर्ग आहेत व ८१ शाळामधून इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग आहेत· या

शाळांना पूर्ण प्राथमिक शाळा म्हटले जाते.


संशोधकाने संशोधनासाठी वरील शाळापैकी उच्च प्राथमिक स्तरावरील मराठी माध्यमाच्या शाळा निवडलेल्या आहेत. या शाळामधील इयत्ता ५ ते ७ वी च्या वर्गांना मराठी विषय शिकविणा-या शिक्षकांना मातृभाषेच्या पाठयपुस्तकातील पाठांमधील मूल्यांच्या संदर्भात एक प्रश्नावली देऊन त्यांची त्याबाबत मते घेतली, ( परिशिष्ट " अ " पहा) याप्रश्नावलीची माहिती पहिल्या प्रकरणात दिलेली आहे.

शहरातील ८१ शाळापैकी ५५ शाळांमधून ७८ शिक्षकांना प्रश्नावल्या दिल्या होत्या, यामधून ६० शिक्षकांनी प्रश्नावल्या भरून परत दिल्या. (परिशिष्ट "ब" पहा) प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या संशोधन साहित्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून त्या संदर्भात अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी संबंधित अध्यापकांशी झालेल्या अनौपचारिक चर्चा, मुलाखती यांचाही लाभ झालेला आहे.

## ५.२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती :

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना मराठी विषयाचे अध्यापन करणा-या व प्रतिसाद देणा-या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती प्रस्तुत संशोधनाला अत्यावश्यक होती. ती मिळविण्याच्या हेतूने प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १ ते ५ प्रश्नांची योजना केलेली होती. त्यामध्ये शिक्षकांचे पूर्ण नाव ( प्रश्न क्रमांक १), शैक्षणिक पात्रता ( प्रश्न क्रमांक २ ), शाळेचे नांव व पत्ता (प्रश्न क्रमांक ३), अध्यापनाचा एकूण अनुभव(प्रश्न क्रमांक४),

आकृती क्रमांक - ५.१


शिक्षकांची शैक्षणिक पात्रता
प्रमाण १ से.मी. = २ शिक्षक संख्या
शिक्षक संख्या
० २ ४ ६ ८ १० १२ १४ १६ १८ २० २२ २४ २६
१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १० ११ १२ १३ १४
१) बी.ए.डी.एड.
२) बी.कॉम.डी.एड.
३) बी.ए.बी.एड.डी.एड.
४) बी.ए.बी.एड.
५) एम.ए.बी.एड.
६) एम.ए.बी.पी.एड.डी.एड.
७) एम.ए.डी.एड.
८) एम.ए. सिनिअर ट्रेंड
९) बी.ए. सिनिअर ट्रेंड
१०) डी.एड.
११) सिनिअर ट्रेंड
१२) ज्युनिअर ट्रेंड
१३) पी.टी.सी.
१४) बी.कॉम.
शैक्षणिक पात्रता

मराठी विषय शिकवण्याचा अनुभव ( प्रश्न क्रमांक ५ ) हे प्रश्न प्रतिसादक शिक्षकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात.

पुढील सारणी ( सारणी क्रमांक ५.१ ) मध्ये शिक्षकांकडून भरून आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे शिक्षकांची शैक्षणिक पात्रता दाखविली आहे.

सारणी क्रमांक ५.१

प्रतिसाद देणा-या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता

| अ.नं. | शैक्षणिक पात्रता | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.ए., डी.एड्. | ११ | १८.३३ |
| २. | बी.कॉम.,डी.एड्. | १ | १.६७ |
| ३. | बी.ए.,बी.एड्.,डी.एड्. | १ | १.६७ |
| ४. | बी.ए., बी.एड्. | १ | १.६७ |
| ५. | एम्.ए., बी.एड्. | १ | १.६७ |
| ६. | एम्.ए., बी.पी.एड्.,डी.एड्., | १ | १.६७ |
| ७. | एम्.ए., डी.एड्., | ७ | ११.६७ |
| ८. | एम्.ए., सिनिअर ट्रेंड | १ | १.६७ |
| ९. | बी.ए., सिनिअर ट्रेंड | ३ | ५.00 |
| १०. | डी.एड्. | २६ | ४३.३३ |
| ११. | सिनिअर ट्रेंड | ४ | ६.६७ |
| १२. | ज्युनिअर ट्रेंड | १ | १.६७ |
| १३. | पी.टी.सी. | १ | १.६७ |
| १४. | बी.कॉम. | १ | १.६७ |
| | एकूण .. | ६० | १००.०३ |

वरील सारणीचा विचार करता ९८.३३% शिक्षक प्रशिक्षित असून ते सदरच्या उच्च प्राथमिक स्तरामधील वर्गांना शिकविण्यास योग्य व्यावसायिक पात्रतेचे आहेत. फक्त १ शिक्षक अप्रशिक्षित असून तो बी.कॉम. पदवीधर आहे. तो २ वर्षे झाली सेवेमध्ये आहे. त्याने डी.एड्. प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांमधील ४५% शिक्षक पदवीधर प्रशिक्षित आहेत. तसेच १६.५७% शिक्षक पदव्युत्तर प्रशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांच्या उच्च शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना निश्चितच होतो असे दिसते. ४१.३३% शिक्षक डी.एड्., असून प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांमध्ये त्याचे प्रमाण अधिक आहे असे आढळले.

पुढील सारणी (सारणी क्रमांक ५.२) मध्ये प्रतिसादक शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.२

शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव

| अ.नं. | अनुभव वर्षे वर्गांतर | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ | ७ | ११.६७ |
| २. | ६ ते १० | १६ | २६.६७ |
| ३. | ११ ते १५ | १३ | २१.६७ |
| ४. | १६ ते २० | ९ | १५.00 |
| ५. | २१ ते २५ | ३ | ५.00 |
| ६. | २६ ते ३० | ४ | ६.६६ |
| ७. | ३१ ते ३५ | ८ | १३.३३ |
| | एकूण .. | ६0 | १00.00 |

वरील सारणी वरुन शिक्षकांचा सरासरी अनुभव पाहिला असता ८•५ वर्षे इतका दिसून येतो• २९ शिक्षक ६ ते १५ वर्षे अनुभव असलेले आहेत• या गटात ४८•३४४ शिक्षक येतात• त्यामुळे त्यांच्या अनुभवाची मते ग्राहय धरावयास हरकत नाही•

प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक ५ मराठी विषय शिकविण्याच्या अनुभवासंबंधी होता• या प्रश्नास दिलेल्या प्रतिसादावरुन पुढील सारणी क्रमांक ५•३ मध्ये चित्र स्पष्ट होते•

सारणी क्रमांक ५•३

शिक्षकांचा "मराठी" विषय शिकविण्याचा अनुभव

| अ•नं• | अनुभव वर्षे (वर्गांतरे) | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | १ ते ५ | २३ | ३८•३३ |
| २• | ६ ते १० | २० | ३३•३३ |
| ३• | ११ ते १५ | ७ | ११•६७ |
| ४• | १६ ते २० | ४ | ६•६७ |
| ५• | २१ ते २५ | ४ | ६•६७ |
| ६• | २६ ते ३० | १ | १•६७ |
| ७• | ३१ ते ३५ | १ | १•६७ |
| | एकूण •• | ६० | १००•०१ |

वरील सारणी वरून असे आढळून येते की, १ ते १५ वर्षे अनुभव असणा-या शिक्षकांचे प्रमाण ८१.२९४ इतके आहे. सर्व्हे घेतेवेळीही पाहिले असता या टप्प्यातील शिक्षकांच्याकडे इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना मराठी विषय शिकविण्याच्या तासिका दिलेल्या होत्या. तसेच या शिक्षकांना नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व डी.एड्. प्रशिक्षणार्थींना सुधारित अभ्यासक्रम याचा लाभ सदरच्या शिक्षकांना झाल्याने त्यांना मराठीचे अध्यापन करण्यामध्ये एक वेगळी दृष्टी लाभलेली आहे असे दिसते. त्यामुळे संशोधनामध्ये याची मते ग्राहय धरण्यास हरकत नाही.

## ५.१ पाठयपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये :


प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखती, पाठांचे निरीक्षण ही साधने हाताळली होती. यामध्ये मराठीचे अध्यापन करणा-या अनुभवी १५ शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या होत्या त्यांची यादी (परिशिष्ट क्रमांक "क" मध्ये) दिलेली आहे. तसेच १० शिक्षकांचे मराठी अध्यापनाच्या पाठांचे निरीक्षण केले होते. याची यादी ( परिशिष्ट क्रमांक "ड" मध्ये ) दिलेली आहे.

शिक्षकांना जी प्रश्नावली दिली होती. त्यामधील प्रश्न क्रमांक ६ शी अनुसरून एक स्वतंत्र यादी पुरविलेली होती. या यादीमध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी च्या बालभारती मराठीच्या पाठयपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये दिलेली होती. या मूल्याखेरीज आणखी काही मूल्ये सदर पाठांमधून प्रतिबिंबित होत असतील तर त्याची नोंद संबंधित पाठांसमोर करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी सुचविलेल्या मूल्यांची यादी ( परिशिष्ट क्रमांक "ई","फ","भ" मध्ये ) दिलेली आहे.

आकृती क्रमांक ५.४

## मूल्यांचे संक्रमणाविषयी अध्यापकांचे मत

प्रमाण - ३१२° : ४८°




सूची: होय म्हणणारे

नाही म्हणणारे.

A-1
paper products
Bombay

## ५·४ पाठय पुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संक्रमण :

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ मराठीच्या पाठयपुस्तकांचे अध्यापन करतांना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. प्रश्नाला दिलेल्या होय/नाही या दोन पर्यायापैकी लागू असणा-या पर्यायासमोर बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगीतले होते. प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये (सारणी क्रमांक ५·४) नमूद केला आहे.

सारणी क्रमांक ५·४

पाठयपुस्तकांतील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्यासंबंधी अध्यापकांची मते

| अ·नं· | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १· | होय | ५२ | ८६·६७ |
| २· | नाही | ८ | १३·३३ |
| | एकूण ·· | ६० | १००·०० |

वरील सारणी (सारणी क्रमांक ५·४) वरून असे अनुमान काढता येते की, मराठीच्या पाठयपुस्तकांचे अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक मूल्ये ≠ संक्रमित केली जातात असे ६० प्रतिसादकांपैकी ५२

प्रतिसादकांचे ( ८६.६७% ) म्हणणे आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही मूल्ये जाणीवपूर्वक संक्रामित केली जात नाहीत. असे ६० पैकी ८ प्रतिसादकांचे (१३.३३%) म्हणणे आहे.

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बहुसंख्य शिक्षकांच्या (८६.६७%) मते उच्च प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठामधून प्रतिबिंबित झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो.

पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात असे प्रतिसादन करणा-या अध्यापकांसाठी प्रश्न क्रमांक८(विचारला होता. या प्रश्नाद्वारे ही मूल्ये कशा प्रकारे संक्रमित केली जातात या संबंधी विचारणा केली होती. या बाबत प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादांमधून कांही समान मार्ग पुढील सारणी मध्ये (सारणी क्रमांक ५.५) नोंदलेले आहेत.

सारणी क्रमांक ५.५

मूल्ये संक्रमित करण्याचे मार्ग

(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणी नुसार)

| अ.नं. | प्रतिसादाकडून मिळालेले प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | थोर पुरुषांची चरित्रे, आदर्श राजे व संतांच्या जीवनातील प्रसंग गोष्टीरूपाने सांगून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचे संक्रमण करता येते. | १८ | ३०.०० |

सारणी क्रमांक ५.५ ... पुढे चालू ...

| अ.नं. | प्रतिसादाकडून मिळालेले प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २. | अध्यापनाच्या वेळी मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रभावी अध्यापनाद्वारे | १० | १६.६७ |
| ३. | सहशालेय उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमातून मूल्ये संक्रमण करणे. | ९ | १५.०० |
| ४. | राष्ट्रीय सण, थोर पुरुषांच्या जयंत्या पुण्यतिथ्यावर आधारित घेतलेल्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग | ७ | ११.६७ |
| ५. | दृकश्राव्य साधनांचा वापर करून मूल्ये ठसविण्यास मदत होते. | ६ | १०.०० |
| ६. | पाठातील आशयाचे स्पष्टीकरणार्थ दिलेले संदर्भ, उदाहरणे, दाखले, दृष्टांत देणे. | ३ | ५.०० |
| ७. | शाळेतील गुणी विद्यार्थी, शिक्षक, समाजातील आदर्श व्यक्ती यांचा विद्यार्थ्यांसमोर गुणगौरव करून त्यांचा सत्कार करणे. | २ | ३.३३ |
| ८. | दैनंदिन जीवनातील घडणाऱ्या घटनेद्वारे मूल्यांची जाणीव करून देणे. | १ | १.६७ |

सारणी क्रमांक ५•५ .... पुढे चालू ...

| अ•नं• | प्रतिसादाकडून मिळालेले प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ९• | प्रत्यक्ष कृतीतून, प्रसंगाद्वारे, संस्था-भेटी, सहलीद्वारे, मूल्यसंक्रमण करता येते• | १ | १•६७ |
| १०• | शिक्षकांच्या आदर्श आचरणाद्वारे | १ | १•६७ |
| ११• | मूल्यावर आधारित प्रश्न विचारून | १ | १•६७ |
| १२• | मूल्यांचे जीवनातील महत्त्व व गरज यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून देणे | १ | १•६७ |
| | एकूण •• | ६० | १००•०२ |

वरील सारणीतील अनुक्रमांक १ मधील ६० पेकी १८ शिक्षकांनी (३०%) मार्ग सुचविला आहे• थोर पुरुषांची चरित्र्ये, आदर्श राजे, संतांच्या जीवनातील प्रसंग गोष्टी रुपाने सांगून मूल्यांचे संक्रमण करता येते असे त्यांचे मत आहे• अधिक संख्येने शिक्षकांनी हा मार्ग सुचविलेला आहे• पुराण काळामध्ये, इतिहासामध्ये अनेक आदर्श व्यक्ती होऊन गेल्या या व्यक्तींच्या जीवनातील उल्लेखनीय घटना मुलांना गोष्टीरुपाने सांगणे, लोककथा, दंतकथा, पारंपारिक कथा सांगून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचे संक्रमण करता येते•

प्रतिसादकांचे हे म्हणणे पटण्यासारखे आहे• इतिहास काळामध्ये अनेक आदर्श संत-महंत होऊन गेले आहेत• या व्यक्तींनी आदर्श मूल्ये अंगी-

करून जगाला, मानवाला आदर्श घालून दिला. या आदर्श व्यक्ती दीपस्तंभाप्रमाणे विद्यार्थ्यांसमोर गोष्टीरूपाने ठेवतो. विद्यार्थी त्याचे अनुकरण करतो.

मूल्ये ही संकल्पना अमूर्त आहे व मूल्यांची स्वीकृती ही व्यक्तीच्या वर्तनातच पहावी लागते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या ठायी मूल्यांची स्वीकृती झाली आहे किंवा नाही हे व्यक्तींच्या वर्तनाच्या निरीक्षणातून आपण ठरवू शकतो. त्याच्या व्यवहारातील वर्तनावर पहाता येते. त्यामुळे पुराण, इतिहास, लोककथा, व्यवहार या सर्वा मधील उदाहरणे, दाखले, प्रसंग या द्वारेच यामूल्यांचे मूर्तरूपात विद्यार्थ्यांना दर्शन घडते. त्यामुळे अशी मूल्ये विद्यार्थ्यात संक्रमित होण्यास सुलभता येते.

सारणीतील अनुक्रमांक २ मध्ये पाठांचे अध्यापन करताना मूल्ये संक्रमित व्हावीत या उद्देशाने केले प्रभावा अध्यापन करावे असे ६० अध्यापकांपैकी १० शिक्षकांनी (१६.६७%) मार्ग सुचविलेले आहे. हा मार्ग बहुतांश शिक्षक अवलंबण्याचा प्रयत्न करतात.

मूल्यांचे संक्रमण करणे म्हणजे मुलांवर संस्कार करणे होय. यासाठी विद्यार्थ्यांना उत्कट अनुभूती द्यावी लागते. उत्कट अनुभूतिसाठी प्रभावी अध्यापनाची आवश्यकता असते. मूल्यसंक्रमण म्हणजे " या हृदयीचे त्या हृदयी घातले " असा प्रकार असतो. विद्यार्थी हा विविध त-हेच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातून शाळेत आलेला असतो. त्यामुळे त्याच्यावर विविध प्रकारचे इष्ट, अनिष्ठ संस्कार झालेले असतात. अशा वेगवेगळ्या वातावरणातून येणा-या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये मूल्ये संक्रमित करण्यासाठी, मूल्यांना अनुसरून वातावरण निर्माण करणे, व त्या मूल्यांच्या संक्रमणासाठी योग्य अशी विद्यार्थ्यांची मनोभूमिका

तयार करणे हे प्रभावी अध्यापनातून शक्य होईल असे प्रतिसादकांचे मत आहे• शिक्षकांनी वर्गामध्ये संस्कारक्षम वातावरण असे केले पाहिजे की, त्याच्या इतर ठिकाणचे जे अनिष्ठ परिणाम झालेले असतात ते त्याने विसरले पाहिजेत• म्हणून मूल्य संक्रमणासाठी हा मार्ग महत्वाचा आहे असे म्हटले पाहिजे•

सारणी क्रमांक ५•५ मधील अनुक्रमांक ३ मध्ये मूल्यसंक्रमणासाठी सहशालेय उपक्रम, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सहभाग घेता येतो असे ६० पैकी ९ प्रतिसादकांचे (१५%) मत आहे•

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण करीत असताना केवळ पाठ्यपुस्तकेच उपयोगी नसून अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमाची आवश्यकता असते• अशा कार्यक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी होऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सुयोग्य, विकासाचे वातावरण शाळेमध्ये निर्माण करून देता येईल• त्यामुळे अभ्यासक्रमामध्ये सहशालेय कार्यक्रमांना महत्वाचे स्थान आहे• अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रम कोणते याचा तपशील प्रश्न क्रमांक १६ व १७ च्या विश्लेषणाच्या वेळी पहावयास मिळेल•

सारणीतील अनुक्रम ४ मध्ये राष्ट्रीय सण, थोर पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन मूल्य संक्रमण करता येईल असे ६० पैकी ७ प्रतिसादकांनी मत नोंदविले आहे• यांचे प्रमाण ११•६७% आहे•

राष्ट्रीय सणामधून देशभक्ती, स्वराज्य यासारख्या मूल्यांचे संक्रम सहजशक्य होईल• थोरांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजऱ्या करून, थोरांच्या

जीवनातील आदर्श विद्यार्थ्यासमोर ठेवता येतात. अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा म्हणजे मूल्यांचे संक्रमण होईल असे कांही शिक्षकांचे मत आहे.

सारणीतील अनुक्रमांक ५ मध्ये १० पैकी १ प्रतिसादकांनी (१०%) दृक्श्राव्य साधनाचा वापर करुन मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये ठसविता येतात. असा मार्ग सुचविलेला आहे. प्रसंगचित्रे, प्रतिकृती, तरंगचित्रे, दूरदर्शन, टेपरेकॉर्ड, रेडिओ, प्रेक्षेपक इ. साधनांचा वापर केल्यास मूल्य ठसविता येतील असे मत कांही शिक्षकांनी प्रतिपादीत केले आहे.

सारणीतील अनुक्रमांक ६ मध्ये १० प्रतिसादकांपैकी १ प्रतिसादकांनी (५%) पाठाचे अध्यापन करीत असताना आशयाचे स्पष्टीकरण करतांना, दिलेली उदाहरणे, दाखले, दृष्टांत या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचे संक्रमण करता येते असे कांही प्रतिसादकांचे मत आहे.

सारणीतील अनुक्रमांक ७ मध्ये १० प्रतिसादकांपैकी २ प्रतिसादकांनी (१.११%) मूल्यसंक्रमणासाठी शाळेतील गुणी विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा, समाजातील आदर्श व्यक्तींचा गुणगौरव करुन शाळेमध्ये सत्कार करावा. असे सुचविले आहे. असे गुण विद्यार्थी अनुकरणाने स्विकारतील असे वाटते.

सारणीतील अनुक्रमांक ८ मध्ये दैनंदिन जीवनातील घटणा-या घटनेद्वारे विद्यार्थ्यांना मूल्यांची जाणीवकरुन द्यावे असे एक शिक्षकाचे मत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रसंगावर आधारीत उदाहरणे द्यावीत. त्यामुळे विद्यार्थी त्या घटनेशी एकरुन होईल व ही अवस्था मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने चांगली आहे.

सारणीतील अनुक्रमांक ९ मध्ये एका शिक्षकाने मूल्य संक्रमणाचा मार्ग सांगताना असे सांगितले आहे की, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती द्यावी, सहलीच्या माध्यमातून विविध स्थळांना भेटी द्याव्यात. त्यामुळे तेथील प्रसंगाचा मुलांच्या मूल्यसंवर्धनासाठी होईल असे वाटते.

सारणीतील अनुक्रमांक १० मध्ये शिक्षकांचे आदर्श वर्तन हे मूल्य संक्रमणास पोषक ठरते असे सांगीतले आहे. वास्तविकरित्या या संबंधीत शिक्षकांचे प्रतिसाद मोठयाप्रमाणात अपेक्षित होते. प्राथमिक स्तरावरील मुले अनुकरण प्रिय असतात. शिक्षकांचे बोलणे, चालणे, वागणे या सर्वांचे ते अनुकरण करतात. विद्यार्थी शिक्षकांना मुख्य आदर्श मानतात. अशावेळी शिक्षकच आदर्श असेल, मूल्यांनी युक्त असेल, त्याच्या वर्तनातून मूल्यांचे प्रतिबिंब दिसत असेल तर साहजिकच मुलेही आपोआप शिक्षकाप्रमाणे आचरण करतील. प्रतिसादकाने नोंदविलेले हे मत अत्यंत महत्वाचे आहे.

सारणीतील अनुक्रमांक ११ मध्ये मूल्यावर आधारित प्रश्न विचारून मूल्यसंक्रमणाचा मार्ग सांगितला आहे. येथे प्रतिसादकाला सॉक्रेटिस संवाद पध्दती किंवा संत गाडगेबाबा यांच्या मताप्रमाणे प्रश्न विचारून मूल्ये रूजविता येतील असे मत व्यक्त केले आहे.

सारणीतील अनुक्रमांक १२ नुसार विद्यार्थ्यांना मूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्व व गरज याची जाणीव करून द्यावी म्हणजे मूल्यांचे संक्रमण होईल असे मत एका प्रतिसादकाने दिले व्यक्त केले आहे. मूल्यांचा अंगीकार केल्याने मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त होते. त्याची सामाजिक प्रतिष्ठा वाढते याची जाणीव मुलांना करून द्यावी असे प्रतिसादकाचे मत आहे.

मूल्ये संक्रमित करता येत नाहीत असे ज्यांनी उत्तर दिले आहे

त्यांच्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्नक्रमांक ९ ची योजना केली होती. पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये विद्यार्थ्यात जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत असे प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांकडून मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित का केली जात नाहीत ? हे जाणून घेण्यासाठी या प्रश्नाची योजना केली होती. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या पूर्वार्धात चार कारणे दिलेली होती. त्यातील सहमत असलेल्या कारणापुढे बरोबर ( ✓ ) अशी होकारात्मक खूण करण्यास सांगितली होती. अध्यापकांनी कारणांना दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत (सारणी क्रमांक ५.६) मांडलेला आहे.

सारणी क्रमांक ५.६

मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नसल्याची कारणे

| अ.नं. | कारणे | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | परीक्षा पद्धतीत मूल्यांवर आधारीत प्रश्न नाही, त्यामुळे अध्यापन नाही. | ४ | ५०.०० |
| २. | मूल्ये शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही. | २ | २५.०० |
| ३. | मूल्ये संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे | १ | १२.५० |
| ४. | दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही. | १ | १२.५० |
| | एकूण .. | ८ | १००.०० |

एकूण ६० प्रतिसादकांनी प्रश्नावल्या भरून दिल्या त्यापैकी ८ प्रतिसादकांनी प्रश्नक्रमांक ९ ला प्रतिसाद दिलेला आहे. हे प्रमाण शेकडा १३.३३% इतके आहे.

सारणी क्रमांक ५.६ मधील अनुक्रमांक १ मध्ये परीक्षा पद्धतीत मूल्यांवर प्रश्न नाही त्यामुळे अध्यापन नाही. या कारणास ८ पैकी ४ प्रतिसादकांनी प्रतिसाद दिलेला आहे. हे शेकडा प्रमाण ५०% आहे. प्रश्नावली भरून देणाऱ्या एकूण ६० प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण ६.६७% आहे.

वरील सारणी क्रमांक ५.६ मधील अनुक्रमांक १ परीक्षा पद्धतीत मूल्यांवर प्रश्न नाही त्यामुळे अध्यापन नाही. हा दिलेला प्रतिसाद पाहता हे प्रतिसादकाचे म्हणणे मान्य करावे.लागेल. परंतु मूल्या या संकल्पनेचे स्वरूप आणि आजच्या परीक्षाचे स्वरूप याचा विचार केला असता आजच्या परीक्षा पद्धतीत मूल्यांवर आधारित प्रश्न आपणास विचारता येतील का? आणि विचारता आल्यास मूल्य संक्रमणाच्या संदर्भात यथार्थ मूल्यमापन करता येईल का? याबाबत अनिश्चितता आहे. तसेच प्रश्नाची योग्य व समर्पक उत्तरे देणारा विद्यार्थी हा मूल्य धारण केलेला असेलच असे नाही. त्यामुळे मूल्य ही बाब केवळ परीक्षेपुरतीच मर्यादित ठेवणे इष्ट नाही.

सारणी क्रमांक ५.६ मधील अनुक्रमांक २ मध्ये मूल्य शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही. यामुळे जाणीवपूर्वक मूल्य संक्रमण केले जात नाही असे मत ८ पैकी दोन प्रतिसादकांनी (२५%) मांडलेले आहे. एकूण ६० प्रतिसादकांच्या बाबतीत विचार हे प्रमाण शेकडा ३.३३% पडते.

प्रतिसादकाच्या या मतानुसार कांही शिक्षकाबाबत असे म्हणावेसे वाटते की, अभ्यासक्रम संपला की, आपला कार्यभाग संपला अशी भूमिकाबनत चालल्याची लक्षणे सध्याच्या शिक्षण पध्दतीत पहावयास मिळतात. अभ्यासक्रम म्हणजे कृमिक पुस्तक असा समज झाला आहे. मूल्य शिक्षणाकडे लक्ष द्यावयाचे म्हणजे स्वतंत्र तास द्यावयाचा किंवा खास जादा वेळ द्यावयाचा असा शिक्षकांचा समज असेल तर तो बरोबर आहे असे वाटत नाही. कारण मराठीचे अध्यापन करीत असताना पाठामध्ये कोणता प्रसंग आहे. त्या प्रसंगामधून विद्यार्थ्यांपर्यंत सहजगत्या कोणते मूल्य संक्रमित करावयाचे याचा दृष्टीकोन असणे महत्वाचे आहे. मूल्यासाठी खास तासिकेची आवश्यकता नाही. तसेच अभ्यासक्रम पूर्ण करणे हा शिक्षकांचा गैर समज निर्माण झाला आहे, अभ्यासक्रम हे एक साधन आहे. साध्य नाही, मूल्यसंक्रमण हे साध्य आहे. साधनावर लक्ष केंद्रित करून साध्याकडे दुर्लक्ष करणे शैक्षणिक दृष्टया उचित होईल असे वाटत नाही.

अनुक्रमांक ३ मध्ये मूल्य संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे. या कारणासाठी ८ पैकी १ प्रतिसादकाने (१२.५%) प्रतिसाद दिलेला आहे. एकूण ६० प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण शेकडा १.६७% पडते. शिक्षण म्हणजे संस्कार, शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणलेले इष्ट ते परिवर्तन या शिक्षणाच्या सर्वमान्य व्याख्या प्रमाणभूत मानल्यास मूल्य संक्रमण करणे ही शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे असे कारण सांगणाऱ्या अध्यापकांना शिक्षणाची मूळ उद्दिष्टेच समजली नाहीत असे म्हणणे प्राप्त आहे. सुदैवाने हे मत प्रतिपादन करणाऱ्या शिक्षकांची संख्या शेकडा १.६७% म्हणजे नगण्य आहे.

अनुक्रमांक ४ मध्ये दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत

नाही•असे कारण दिले आहे• यास ८ पैकी १ प्रतिसादकाने (१२•५%) प्रतिसाद दिलेला आहे• प्रश्नावली भरून देणा-या एकूण ६० प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण १•६७% इतके आहे•


जीवन आणि शिक्षण यांची फारकत करता येत नाही• तसेच मूल्ये ही जीवनात प्रतिबिंबित होतात व त्याच्या स्वीकार व्यक्ती शिक्षणाद्वारे करीत असते• आजच्या भ्रष्टाचारी, लाचलुचपत आणि वशिले-बाजी यांनी बरबटलेल्या सामाजिक जीवनातील दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही• असे म्हणणे कांही प्रसंगी खरेही असेल• तथापि वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्य व केवळ आर्थिक उत्कर्षच नव्हे तर सांस्कृतिक उत्कर्षाच्या दृष्टीने विचार केला तर मूल्ये मानणारी आणि त्यांची प्राणपणाने निष्ठापूर्वक जोपासना करणारी माणसे कोणत्याही समाजात सर्वकाळ हवी असतात• म्हणून ती जाणीवपूर्वक संक्रमित न करण्यापेक्षा ते एक आव्हान समजून संक्रमित करणे आवश्यक आहे•असे नमूद करावेसे वाटते•

मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नसल्यास प्रश्नावलीमध्ये नमूद केलेल्या कारणा व्यतिरिक्त अन्य कारणे कोणती आहेत हे जाणून घेण्याच्या उद्देशाने याच प्रश्नाच्या उत्तरार्धात मुक्त प्रश्नांची योजना करण्यात आलेली होती• ६० प्रतिसादकांपैकी केवळ ८ प्रतिसादकांनी मूल्ये संक्रमित केली जात नाहीत असे मत मांडल्यामुळे त्यांनी या प्रश्नाच्या उत्तरार्धात अन्य कारणांची नोंद केलेली नाही•

## ५•५ पाठांतील मूल्यांचे संक्रमित होण्याचे प्रमाण :

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १० मध्ये आपण संक्रमित करू इच्छिणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात संक्रमित होतात ? हा बंदिस्त स्वरूपाचा

आकृती क्रमांक - ५.७


मूल्य संक्रमणाचे प्रमाण
प्रमाण - १ से.मी. = ५ शिक्षक
मूल्य संक्रमणाचे प्रमाण
५ मूल्ये संपूर्णपणे संक्रमित होतात.
४ मूल्ये मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात.
३ मूल्ये मध्यम प्रमाणात संक्रमित होतात.
२ मूल्ये अल्प प्रमाणात संक्रमित होतात.
१ मूल्ये आजिबात संक्रमित होत नाही.
० ५ १० १५ २० २५ ३० ३५ ४० ४५ ५०
शिक्षक संख्या

प्रश्न होता. संक्रमित मूल्याचे प्रमाण जाणून घेण्यासाठी उत्तराच्या ठिकाणी पाच प्रमाणके दिलेली होती. व प्रतिसादक ज्या प्रमाणकाशी सहमत असेल त्या प्रमाणकापुढे बरोबर ( ✓ ) अशी होकारात्मक खूण करण्यास सांगितली होती. अध्यापकांनी प्रमाणकांना दिलेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ५.७:मध्ये मांडलेला आहे.

सारणी क्रमांक ५.७

मूल्ये संक्रमणाची प्रमाणके

| अ.नं. | प्रमाणके | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मूल्ये संपूर्णपणे संक्रमित होतात | ०० | ०० |
| २. | मूल्ये मोठयाप्रमाणात संक्रमित होतात | ६ | ११.५४ |
| ३. | मूल्ये मध्यम प्रमाणात संक्रमित होतात | ३६ | ६९.२३ |
| ४. | मूल्ये अल्प प्रमाणात संक्रमित होतात | १० | १९.२३ |
| ५. | मूल्ये अजिबात संक्रमित होत नाहीत | ०० | ०० |
| | एकूण .. | ५२ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ५.७ मध्ये अनुक्रमांक १ च्या प्रमाणकाशी ५२ पैकी एकाही प्रतिसादकांने आपले मत नाही हे बरोबर वाटते कारण मूल्ये संपूर्णपणे केंव्हाही संक्रमित होऊ शकणार नाहीत. मूल्यसंक्रमणाच्या वेळी व्यक्तींची स्थिती, परिस्थिती, संक्रमणातील अडथळे, मूल्याबाबतची भूमिका इत्यादी बाबतीत त्रुटी संभवतात. त्यामुळे प्रतिसादकांनी आपली मते नोंदविल असता विचार करून नोंदविलेले दिसते.

अनुक्रमांक २ च्या प्रमाणकाशी ५२ पैकी ६ प्रतिसादकांनी (११•५४%) आपले मत नोंदविलेले आहे• अनुक्रमांक ३ च्या प्रमाणकाशी ५२ पैकी ३६ प्रतिसादकांनी (६९•२३%) मूल्ये मध्यम प्रमाणात संक्रमित करता येतात•असे मत व्यक्त केले आहे• या प्रमाणकाशी बहुतांश अध्यापक सहमत झालेले दिसतात•

अनुक्रमांक ४ च्या प्रमाणकाशी ५२ पैकी १० प्रतिसादकांनी (१९•२३%) आपली मते नोंदविली आहेत• यांच्या मते मूल्ये अल्पप्रमाणात संक्रमित होतात असे म्हणणे आहे• सध्याची परिस्थिती पाहिली असता हे प्रमाण योग्य आहे असे वाटते•

अनुक्रमांक ५ मध्ये मूल्ये अजिबात संक्रमित होत नाहीत• यासाठी कोणतीही प्रतिसाद दिलेला नाही• हे योग्य आहे• कारण मुले म्हणजे निर्जिव वस्तू नव्हेत• त्यांच्यामध्ये सूक्ष्म प्रमाणात कां होईना मूल्ये संक्रमित होत असलीच पाहिजेत•

सदरचे संशोधन हा चिकित्सक अभ्यास असल्याने मूल्ये संपूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात संक्रमित का होत नाहीत हे जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रश्नावलीमध्ये पुढील प्रश्न विचारले होते• विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये संक्रमित करण्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात ? या प्रश्नाची योजना केली होती• हा प्रश्न प्रश्नक्रमांक ११ मध्ये विचारला होता• या प्रश्नामध्ये ६० पैकी ४७ प्रतिसादकांनी ( ७८•३३% ) प्रतिसाद के दिलेला आहे• या ७८•३३% प्रतिसादकांनी सुचविलेल्या प्रतिसादामधून समान आशयाचे प्रतिसाद एकत्रित करुन मूल्य संक्रमणातील अडचणी पुढील सारणी क्रमांक ५•८ मध्ये नोंदलेले आहेत•

## सारणी क्रमांक ५.८

## मूल्ये संक्रमणातील अडचणी

| अ.नं. | मूल्य संक्रमण मोठ्या प्रमाणात न होण्याची कारणे | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शाळेत होणारे संस्कार तात्पुरते असून कौटुंबिक व समाज जीवनातील दुर्गुणतेचा प्रभाव विद्यार्थ्यांवर अधिक प्रमाणात दिसून येतो. | १५ | ३१.९१ |
| २. | शालेय जीवनातील औपचारिकपणा शालेय परिसर, पुस्तकीज्ञानावर भर, साचेबंद पद्दतीचा वापर, शैक्षणिक साधनांचा अभाव. | १२ | २५.५३ |
| ३. | सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे मूल्यशिक्षण हा दृष्टीकोन शिक्षकाच्या अध्यापनातून स्पष्ट होत नाही, शिक्षकांना मूल्या-बाबत प्रशिक्षण नाही. शिक्षकांवर अशैक्षणिक कामाचा वाढता बोजा, शिक्षकांना अनेक विषय शिकवावे लागतात. | १० | २१.२८ |
| ४. | विद्यार्थी परीक्षार्थी बनत चालला आहे, शिक्षण नोकरीसाठी ही धारणा, विद्यार्थ्यांची विलासीवृत्ती, आदरवृत्ती | ६ | १२.७७ |

सारणी क्रमांक ५•८ •••• पुढे चालू ••••

| अ•नं• | मूल्य संक्रमण मोठया प्रमाणात न होण्याची कारणे | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| | मूल्याबाबत उदासिनवृत्ती, मूल्याचा मूल्यमापनाशी संबंध नाही• | | |
| ५• | प्रत्येक शाळेत वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या, शिक्षक-विद्यार्थी संबंधामधील जिव्हाळ्याचा अभाव | २ | ४•२६ |
| ६• | प्रसार माध्यमांचा बालकावर होणारा अनिष्ठ परिणाम | २ | ४•२६ |
| | एकूण •• | ४७ | १००•०१ |

सारणी क्रमांक ५•८ मधील अनुक्रमांक १ मध्ये शाळेत होणारे संस्कार तात्पुरते असून समाजातील व कौटुंबीक जीवनातील अस्थिरतेचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो• त्यामुळे मूल्ये मोठया प्रमाणात संक्रमित करता येत नाहीत• असे ४७ पैकी १५ प्रतिसादकांनी (३१•९१%)प्रतिसाद दिलेला आहे• एकूण ६० प्रतिसादकांचा विचार करता याचे शेकडा प्रमाण २५% इतके आहे•

या प्रतिसादकांचे मत असे आहे की, वर्गात शिक्षक मुलांच्यावर संस्कार करतात• विद्यार्थी शाळेमध्ये २४ पैकी केवळ ५ तास असतो• व इतर

१९ तास कुटुंब व समाजामध्ये वावरत असतो. ५ तासामध्ये केलेले संस्कार हे विद्यार्थ्यांच्या मनावर तात्पुरत्या स्वरूपाचे कार्य करतात. असेच वातावरण कुटुंबामध्ये व समाजामध्ये नसते. कुटुंबातील दारिद्र्य, व्यसनाधिनता, भांडणतंटा यामुळे मुलांवर कुसंस्कार होतात. श्रीमंतीत वाढणारी मूल्ये विलासीवृत्तीची बनतात. पालक मुलाचे लाड करतात त्यामुळे मुलांना ज्या त्या वेळी हवे ते न मिळाल्यास अनैतिक वर्तन करण्यासप्रवृत्त होतात.

सामाजातील परिस्थिती पाहिल्यास भ्रष्टाचार, गुंडगिरी, काळाबाजार, यांचेच राज्य दिसून येते. यामुळे मूल्यांचा ऱ्हास होत असताना आपण पहातो. मूल्यशिक्षण आणि जीवन व्यवहार यांची फारकत या जीवन पध्दतीमध्ये झालेली पदोपदी जाणवते. कोणत्याही मार्गाने पैसा मिळवून प्रतिष्ठेने जगता येते अशी समजूत झालेली दिसते. व्यक्तीने सद्वर्तनी असावे अशी अपेक्षा केली जाते, पण प्रत्यक्षात सद्वर्तनाचे ढोंगच समाजामध्ये दिसून येते. मूल्यांचा समाजात होणारा हा ऱ्हास थांबवायचा असेल तर येणारी पिढी उदात्त विचारांनी युक्त अशी निर्माण करण्याचे कार्य शिक्षकांचे आहे. त्यामुळे मूल्यसंक्रमणाचे कार्य अध्यापकांनी जाणीवपूर्वक करणे गरजेचे आहे.

सारणीतील अनुक्रमांक २ मध्ये दर्शविलेली कारणे ४७ पैकी १२ प्रतिसादकांनी(२५.५३%) प्रतिसादाच्या रूपात दिलेली आहेत. एकूण ६० प्रतिसादकांचा विचार करता याचे शेकडा प्रमाण २०% इतके आहे.

शालेय जीवनातील सर्व कामकाज नियमबध्द व शिस्तबध्द असते. ते असावे याबाबत कोणाचे दुमत असणार नाही. पण यामुळे औपचारिकपणा जाणवतो. सर्व कामकाज काटेकोरपणे त्यामुळे कोठेही

लवचिकता नसते. तोच तोच पणा येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा म्हणजे तुरुंग असा भास होतो. हे वातावरण बदलावयाचे असल्यास या औपचारिकपणामध्ये मानवी घटकांकडून अनौपचारिकता आणावी व विद्यार्थी शालेय वातावरणामध्ये रममाण होईल. तरच शाळेतील संस्कार त्याच्या मनावर कायम स्वरूपात दृढमूल होतील. शालेय परिसर उत्साहवर्धक असावा. शालेय इमारत कोंदट वातावरणामध्ये असेल, शालेय परिसर गलिच्छ वस्तीचा असेल तर मुलांवर चांगले संस्कार करता येणे कठीण होईल. म्हणून यासाठी संस्था चालकांनी याचा विचार करून शालेय इमारत शास्त्रशुद्ध पध्दतीने बांधावी, यासाठी जागेची निवड चांगली करावी. परिसर स्वच्छ असावा. शाळेने ही विद्यार्थ्यांच्या मदतीने स्वच्छता करून घेवून स्वच्छतेचे महत्त्व सांगावे.

अभ्यासक्रम म्हणजे क्रमिक पुस्तक. पुस्तकीज्ञान म्हणजे विषयाची पूर्ण तयारी यावर शिक्षकांचा भर दिसतो. अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमाकडे काही शाळेचे दुर्लक्ष होते. क्रमिक पुस्तक, विषय, तासिका, चाचणी, सहामाही परीक्षा, वार्षिक परीक्षा, निकाल शाळेतील ही सर्व कामे साचेबंद पध्दतीने चालतात. अपुरी भौतिक साधने, शैक्षणिक साधनांचा आवश्यक तेवढा पुरवठा होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार करण्यास शालेय वातावरण कमी पडते असे जाणवते. शैक्षणिक साधना-द्वारे विद्यार्थी पाठाशी एकरूप होईल. अध्ययनामध्ये अभिरुची निर्माण होईल. याबरोबर सहजगत्या मूल्यसंक्रमणाची प्रक्रिया घडेल याची जाणीव शिक्षकांना असली पाहिजे.

सारणी क्रमांक ५.८ मधील अनुक्रमांक ३ मध्ये दर्शविलेली कारणे ४७ पैकी १० प्रतिसादकांनी (२१.२८%) प्रतिसाद दिलेला आहे. एकूण ६० प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण १६.६७% इतके आहे.

शिक्षक विषयाचे अध्यापन करतो म्हणजे त्या विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देतो. मूल्य ही बाब स्वतंत्र तास घेवून मूल्य शिक्षणाचे अध्यापन करावे अशी योजना शिक्षण संस्थामध्ये असत नाही. कोणताही विषयाचे अध्यापन करीत असताना त्यातून कोणतेज्ञान विद्यार्थ्याला देता येईल. त्या ज्ञानातून त्याची कोणती वृत्ती घडेल. त्याचे व्यक्तीमत्व संपन्न बनेल का? त्यामुळे सामाजिक व राष्ट्रीय जीवन सुखमय होईल की ? याचा विचार शिक्षकाने अध्यापनाच्यावेळी केला पाहिजे. राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग, १९८६ चे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या सर्वांनी मूल्य शिक्षणाची गरज सांगितलेली आहे. पण यामुल्य शिक्षणाबाबतचे प्रशिक्षण शिक्षकांना मिळते का? आणि मिळत असल्यास आतापर्यंत किती शिक्षकांना याचा लाभ झाला आहे ? प्रशिक्षणानंतर ते शिक्षक मूल्यांच्या संक्रमणासाठी कोणते प्रयत्न करतात ? हा संशोधनाचा भाग आहे. सर्वच शिक्षकांना मूल्यशिक्षण प्रशिक्षण देणे आवश्यक आहे असे वाटते.

शिक्षकांना शिक्षणाशिवाय अनेक अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याने मूल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. हे काम त्यांनी स्वखुशीने करावे असे न वाटता ते त्यांच्यावर लादले जाते. त्यामुळे शालेय कार्या-कडे मुळातच त्याचे लक्ष नसते. प्राथमिक शिक्षकांना अशी कामे अधिक करावीलागतात. उदा. मतदार यादी तयार करणे, जनगणना करणे, गावातील कौटुंबिक सर्व्हे घेणे, प्रौढशिक्षण, साक्षरता अभियान, कुटुंब नियोजनाचा प्रचार करणे इत्यादी यातील काही जबाबदा-या शिक्षकाने स्वखुशीने स्विकारल्या पाहिजेत. अशा कारणाने शिक्षकाने आपल्या शैक्षणिक जबाबदा-या कडे दुर्लक्ष होऊ देता कामा नये. माध्यमिक शाळेमध्ये

एका शिक्षकाला एक किंवा दोनच विषय शिकवावे लागतात. पण प्राथमिक शाळेमध्ये अनेक विषय शिकवावे लागतात. पण अनेक विषय शिकवताना मूल्याकडेदुर्लक्ष होते असे म्हणणे पटत नाही. प्रत्येक विषयामध्ये मूल्ये ही असतातच. ती योग्य त्या प्रसंगी आल्यानंतर शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये कशी रूजतील याची जाणीव ठेवली पाहिजे.

सारणी क्रमांक ५.८ मध्ये अनुक्रमांक ४ मध्ये ४७ पैकी ६ प्रतिसादकांनी (१२.७७%) प्रतिसाद दिलेला आहे. एकूण ६० प्रतिसादकांचा विचार केल्यास हे प्रमाण १०% आहे.

प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, पालकांची एकच इच्छा असते की, मुलगा चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण व्हावा. कारण शिक्षणाकडे चरितार्थाचे साधन म्हणून पाहिले जाते. चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण होवून चांगली नोकरी मिळविणे ही शिक्षणाकडून अपेक्षा धरलेली आहे. परीक्षेत उत्तम गुण मिळविणे म्हणजे उत्तम शिक्षण अशी समाजाची धारणा झालेली आहे. चांगले गुण मिळवून उत्तीर्ण होणारा विद्यार्थी संस्कारक्षम असेल असे सांगता येत नाही. परंतु आजचे शिक्षण परीक्षापध्दतीच्या विळख्यात सापडलेले आहे. परीक्षा केवळ स्मरणाचीच चाचणी होते. मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने प्रतिसादकाचे हे मत ग्राह्य मानावयास हरकत नाही.

विद्यार्थी समाजातील लोकांची विलासीवृत्ती पहातो. वाममार्गाने पैसा कसा मिळवावा, तो कसा खर्च करावा, हे मार्ग तो पहातो व त्याप्रमाणे तो वागू लागतो. त्याचे वर्तन स्वैर प्रकारचे होते. अशावेळी तो आप्तेष्ठांचा अनादर करतो. अशा अनादरवृत्तीमुळे तो बेफिकीर बनतो अशा वेळी मूल्य संक्रमणास अडथळे येतात. जसे परीक्षेमध्ये

विषयाना गुणदान असून पेपर लिहिले जातात. त्याप्रमाणे मूल्याचे मूल्यमापन होत नाही. आणि ज्याचे मूल्यमापन होत नाही त्याचा उपयोग काय ही वृत्ती शिक्षक व विद्यार्थी या दोघांची असते. निकाल पत्रिकेमध्ये मूल्याबाबतचा उल्लेख करता येईल. शिक्षकाने वर्षभर विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून वार्षिक परीक्षेमध्ये त्याना गुण द्यावेत. विषयाच्या गुणा पेक्षा या गुणाना अधिक महत्त्व द्यावे. म्हणजे मूल्यसंक्रमण सुलभ होईल असे वाटते.

सारणी क्रमांक ५.८ मध्ये अनुक्रमांक ५ मध्ये ४७ पैकी २ प्रतिसादकांनी ( ४.२६% ) प्रतिसाद दिलेला आहे. एकूण ६० प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण ३.३३% इतके ह आहे. म्हणजे अल्प प्रमाण आहे. सध्या प्रत्येक शाळेमध्ये, प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. त्यामुळे शिक्षकांना व्यक्तीगत लक्ष देणे अवघड झाले आहे. विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असली तर व्यक्तिगत लक्ष देणे सुलभ जाते. विचारपूस करता येते. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे शिक्षकांना हे अवघड झाले आहे. प्रतिसादकांचे हे मत ग्राह्य मानण्यास हरकत नाही. सध्या शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध जिव्हाळ्याचे राहिले नाहीत. विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. विद्यार्थी परीक्षार्थी बनला पाहिजे असेच प्रयत्न शिक्षकाचे आहेत. शिक्षकही व्यवहारवादी बनत चालला आहे. व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास, सुसंस्कार याबाबीकडे तो दुर्लक्ष करू लागला आहे. विद्यार्थ्यांशी त्याचे नाते फक्त वर्गातील तासिकेपुरते राहिले आहे. यामुळे मूल्यसंक्रमण होणे अडचणीचे झाले आहे.

सारणी क्रमांक ५.८ मध्ये अनुक्रमांक ६ मध्ये ४७ प्रतिसादकांपैकी २ प्रतिसादकांनी (४.२६%) प्रतिसाद दिलेला आहे. एकूण ६०प्रतिसादकांचा

विचार करता हे प्रमाण १.३३% आहे. हे प्रमाण अल्प आहे. प्रसार माध्यमामध्ये रेडिओ, दूरदर्शन, व्ही.डी.ओ., चित्रपट, वृत्तपत्रे यांचा समावेश होतो. वास्तविकरित्या या माध्यमांचा उत्कृष्ट शैक्षणिक साधन म्हणून वापर करता येतो. पण या माध्यमाचे सध्याचे स्वरूप संमिश्र आहे. विद्यार्थी दूरदर्शनवरील शालेय कार्यक्रम, सुरभि, बालचित्रवाणी, टर्निंग पॉईंट, यासारखे कार्यक्रम न पहाता चित्रहार न चुकता पाहतो. त्यामधील अश्लीलता स्विकारतो. चित्रपटातील दृश्ये पाहिल्यास खून, बलात्कार, स्मगलिंग यांचे दर्शन त्याना होते. वृत्तपत्रातील बातम्याही यासारख्याच असतात. याचा समग्र परिणाम विद्यार्थ्यांवर होऊन विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण करण्यास आवश्यकती मनोवृत्ती तयार करण्यास अडचण निर्माण होते. अशा वातावरणामध्ये शिक्षकांनी या प्रसार माध्यमाचा वापर कसा करावा, कोणते कार्यक्रम पहावे, ऐकावे याबाबत मार्गदर्शन करावे.

## ५.६ मूल्य संक्रमणातील अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमांचे महत्व :

विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमण करण्यामध्ये अनेक अडचणी, समस्या आहेत. त्यापैकी कांही अडचणी वर आपण मार्ग काढू शकतो. याबाबतील सारणी क्रमांक ५.८ मधील कारणांचा उहापोह केला, प्रश्नावलीमध्ये प्रश्नक्रमांक १२ मध्ये मूल्य संक्रमणातील अडचणीवर तुम्ही कशा प्रकारे मात करू शकाल ? पाठातील प्रतिबिंबीत होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी काय केले पाहिजे ? हा प्रश्न क्रमांक १३ मध्ये विचारलेला होता. या प्रश्नाच्या योजनेतून प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादामधून समान आशयाचे प्रतिसाद एकत्र करून मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी त्यांनी सुचविलेले मार्ग व त्याची

वारंवारिता पुढील सारणी क्रमांक ५.९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्रमांक ५.९

मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग

| अ.नं. | मूल्ये संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शिक्षकांचे चारित्र्य आदर्श हवे, विद्यार्थ्यांनी त्यांचे आचरण अनुसरावे, शिक्षकाने विद्यार्थ्यांला समजून घेतले पाहिजे. | २२ | २९.७१ |
| २. | समान मूल्ये असणारे पाठ सलग शिकवावेत, पाठातील घटनांवर प्रसंगनिर्मिती हुबेहुब करावी;मूल्यकेंद्रित अध्यापन पध्दतीचा वापर करावा. | १७ | २२.९७ |
| ३. | विद्यार्थ्यांना कर्तव्याची जाणीव करुन द्यावी. त्यांच्यामधील न्युनगंडतेची भावना नष्ट करुन मूल्यांचे महत्व पटवून दिले पाहिजे. | १५ | २०.२७ |
| ४. | शिक्षकांना मूल्याबाबत प्रशिक्षण द्यावे माता-पित्यांचे उद्बोधन वर्ग घ्यावेत, शाळा,घर येथील वातावरण संस्कारक्षम बनवावे. | ८ | १०.८१ |

सारणी क्रमांक ५.९ .... पुढे चालू ...

| अ.नं. | मूल्य संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ५. | पौराणिक, ऐतिहासिक, उदाहरणाचा दाखल्यांचा व दृष्टांतांचा वापर करावा, कथा, श्लोक, सुविचार माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये संक्रमित करता येतात. | ६ | ८.११ |
| ६. | मूकबधीर विद्यालय, मतिमंद विद्यालय, अनाथाश्रम, अपंगासाठी कार्य करणारी संस्था अशा संस्थांना भेटी देवून विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याबाबत सहानुभूती निर्माण करता येईल. | ४ | ५.४१ |
| ७. | पालकांना किंवा तज्ञ व्यक्तींना निमंत्रण देऊन "विविध धर्मातून एकता" या विषयावर सहविचार सभा आयोजित करता येईल. | २ | २.७० |
| | एकूण .. | ७४ | १००.०० |

टीप : प्रश्नावलीस प्रतिसाद देणा-या शिक्षकांपैकी काही शिक्षकांनी एकाहुन अधिक मार्ग सुचविल्यामुळे बेरीज ६० हून अधिक आलेली आहे.

वरील सारणी क्रमांक ५•९ मध्ये अनुक्रमांक १ मध्ये ७४ पैकी २२प्रतिसादकांनी (२९•७३%) प्रतिसाद दिलेला आहे• १/३ शिक्षकांनी शिक्षकांच्या चारित्र्याचा आणि मूल्ये चांगल्यारितीने संक्रमित होण्याचा संबंध सांगितला आहे•

शिक्षकांचे प्रसन्न व उत्साही व्यक्तिमत्त्व, त्याचा व्यासंग, अंत:करणपूर्वक अध्यापन, विशिष्ट दृष्टीकोन, विद्यार्थ्यांवरील श्रध्दा, इत्यादी घटकांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत असतो• नैतिकता व्यक्तीच्या आचरणातून ज्यावेळी प्रत्ययाला येत असते• त्यावेळी तो माणूस चारित्र्य संपन्न आहे असे आपण म्हणतो• शिक्षकाने विद्यार्थ्यांशी ठेवलेले आपुलकीचे संबंध त्यांच्या अंतर्मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण करतात• प्राथमिक स्तरावर काम करणा-या शिक्षकांचे वर्तन आदर्शच असले पाहिजे• कारण विद्यार्थी त्यांचे आचरण करतात• गुरूवर त्यांची अपार श्रध्दा असते• विद्यार्थ्यांच्या गरजा त्याने समजून घेतल्या पाहिजेत• त्यानी त्या पुरविल्या पाहिजे• शिक्षकाची प्रत्येक कृति आदर्श हवी• तरच मूल्य संक्रमण होईल व ती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये पक्की रूजतील•

सारणी क्रमांक ५•९ मधील अनुक्रमांक २ मध्ये ७४ पैकी १७ प्रतिसादकांनी (२२•९७%) प्रतिसाद दिलेला आहे• प्रत्येक इयत्तामध्ये कांही पाठ समान मूल्ये संक्रमित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत• वर्षाच्या सुरूवातीसच मराठीचे अध्यापन करणा-या शिक्षकांनी समान मूल्ये कोणकोणत्या पाठातून व्यक्त होतात याचा शोध घेवून ते पाठ एकत्रित करावेत• आणि त्याचे सलग अध्यापन करावे• म्हणजे एकाच प्रकारची वृत्ती चिरकाल त्याच्यामनावर ठसेल, भावनांचे स्थिरीकरण होवून मूल्य संक्रमण होईल• पाठाचे अध्यापन करीत असताना पाठामध्ये

ज्या व्यक्तिरेखा आहेत. त्यांच्यामध्ये कोणती घटना घडली आहे. त्या त्या भिन्न प्रसंगी त्या कशा बोलतात, त्यातून त्याची कोणती वृत्ती दिसून येते. याचा विचार करुन शिक्षकांनी प्रसंगाचे हुबेहुब वर्णन करावे म्हणजे भावना जागृत होईल त्यामुळे मूल्यसंक्रमणाची अवस्था प्राप्त होईल. त्यांनी अध्यापन पध्दतीचा वापर करीत असताना मूल्यशिक्षण केंद्रित पध्दतीचा वापर केला पाहिजे.

सारणी क्रमांक ५.९ मधील अनुक्रमांक ३ मध्ये ७४ पैकी १५ प्रतिसादकांनी (२०.२७%) प्रतिसाद दिलेला आहे. त्या विद्यार्थ्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव आहे त्या विद्यार्थ्यांवर संस्कार चांगले झालेले आहेत असे म्हणावयास हरकत नाही. पण सध्याचा विद्यार्थी स्वत: आचारसंहितेच्या बाबतीत बंधने पाळीत नाही.आणि त्यांना सांगण्याचा प्रयत्न केल्यास एक औपचारिक बाब म्हणून पालन केले जाते. अशावेळी मुलाला वडिलांनी, शिक्षकांनी त्याला विश्वासात घेवून मूल्याचे महत्त्व सांगितले पाहिजे. त्याच्या मनातील न्यूनगंड नाहीसा करुन त्याला मूल्याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. महत्वा अगोदर त्याला स्वत्वाची जाणीव करुन दिली पाहिजे.

सारणी क्रमांक ५.९ मधील अनुक्रमांक ४ मध्ये ७४ पैकी ८ प्रतिसादकांनी (१०.८१%) प्रतिसाद दिलेला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधा संबंधी मुलाखती शिवाय कांही शिक्षकांच्या बरोबर अनौपचारिक चर्चा झाली तेंव्हा असे आढळून आले की, मूल्य म्हणजे काय? मूल्य संक्रमण म्हणजे काय ? या संबंधी मूलभूत ज्ञानाबाबत अज्ञान जाणवले. यानंतर असा विचार पुढे येतो की, शिक्षकांना मूल्य शिक्षणाचे प्रशिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. मूल्यशिक्षण हा सर्व विषयाचा

गाभाभूत घटक आहे. याची जाणीव शिक्षकाला असणे महत्वाचे आहे.

वर्तमानकालिन विभक्त कुटुंब पध्दती, जमाखर्चाची तडजोड, नोकरीची किंवा व्यवसायामधील धडपड अशा वातावरणामध्ये मुलांच्यावर संस्कार करण्यास फुरसद मिळणे अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत शाळेमध्ये किंवा सेवाभावी संस्थानी मूल्याच्या जोपासनेसंबंधी माता-पित्याचे उद्बोधन वर्ग घेतले पाहिजेत. शाळेतही शिक्षकांनी संस्कारक्षम वातावरण निर्माण केले पाहिजे.

अनुक्रमांक ५ मध्ये ४७ पैकी ६ प्रतिसादकांनी (८.११%) प्रतिसाद दिलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी अध्यापनाच्यावेळी पौराणिक, ऐतिहासिक उदाहरणांचा व दाखल्यांचा वापर करावा. उद्बोधनपर कथा सांगाव्यात, श्लोक व सुविचार कथनाच्या माध्यमातून मूल्ये संक्रमित करता येतात.

अनुक्रमांक ६ मध्ये ७४ पैकी ४ प्रतिसादकांनी (५.४१%) प्रतिसादामध्ये मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी नवनवीन मार्ग सुचविले आहेत. समाजातील मुकबधीर, मतिमंद विद्यालयाना भेटी देऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनाविषयी ओळख करून देता येईल. त्यांच्या बाबत जिव्हाळा, सहानुभूती निर्माण होईल. अनाथ मुले अपंग मुलांच्या भेटी घडवाव्यात. यातून त्याना असे वाटेल की, ही सुध्दा आपलीच भावंडे आहेत. असाह्य परिस्थितीतही शिक्षण घेत आहेत. स्वावलंबी बनत आहेत.याना आपल्या परीने मदत केली पाहिजे. निदान मोठे झाल्यानंतर त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केला पाहिजे. याची जाणीव व्हावी यासाठी हा त्यांनी मार्ग सुचविला आहे.

अनुक्रमांक ७ मध्ये ७४ पैकी केवळ २ प्रतिसादकांनी (२.७०%) प्रतिसाद दिलेला आहे. यामध्ये मूल्ये चांगल्यारितीने संक्रमणासाठी पालकांच्या व समाजातील तज्ञ व्यक्तींचे सहकार्य घेता येईल असे म्हटले आहे. राष्ट्रीय एकात्मता, विविध धर्मातून एकता अशा विषयावर सहविचार सभा आयोजित करता येईल.

मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने शिक्षकांना मार्गदर्शनासाठी हस्तपुस्तिका असावी किंवा नसावी याबाबत प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १४ विचारला होता. या प्रश्नाचे उत्तर, होय अगर नाही या स्वरूपाचे होते. याला प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.१० मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक - ५.१०

मूल्या बाबत शिक्षकांना हस्तपुस्तिकेची गरज

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ५८ | ९६.६७ |
| २. | नाही | २ | ३.३३ |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ५.१० वरून असे दिसून येते की, मूल्याबाबत शिक्षकांना हस्तपुस्तिकांची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले आहे. बहुतांश शिक्षकांना असे वाटते की, मराठीच्या पाठयपुस्तकामध्ये प्रत्येक पाठामध्ये कोण कोणती मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत यांच्या मार्गदर्शना-

बाबत हस्तपुस्तिका असाव्यात असे म्हटले आहे. ६० प्रतिसादकांपैकी ५८ प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या हस्त-पुस्तिकाद्वारे शिक्षकाची मूल्य-संक्रमणाची धारणा निश्चित होईल आणि त्याप्रमाणे तो पाठाचे अध्यापन करताना तसा दृष्टीकोन त्यांच्यामध्ये निर्माण होईल. नकारात्मक प्रतिसादकांना मुलाखतीमध्ये चर्चा झाली तेंव्हा ते म्हणाले पाठातील आशयाप्रमाणे शिक्षकाला मूल्याबाबत दृष्टीकोन समजला पाहिजे. हस्तपुस्तिकेची गरज नाही. व्यासंगी, प्रयत्नशील शिक्षक मूल्याबाबत अधिक विचार करून मूल्यसंक्रमणासाठी झटत असतो.

पाठयपुस्तकातील मूल्ये संक्रमण करण्याच्या दृष्टीने कोही अभ्यासपूरक कार्यक्रम योजता का ? हा प्रश्नावली मध्ये होय/ नाही स्वरूपाचा बंदिस्त प्रश्न विचारला होता. यास प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.११ मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.११

मूल्ये संक्रमित करण्याच्या उद्देशाने अभ्यासपूरक कार्यक्रम योजतात की नाही हे जाणून घेणे

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ५६ | ९३.३३ |
| २. | नाही | ४ | ६.६७ |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वरील सारणी क्रमांक ५•११ मधील प्रतिसादका पैकी ९३•३३% प्रतिसादक आपल्या शाळेमध्ये मूल्य संक्रमित करण्याच्या उद्देशाने अभ्यासपूरक कार्यक्रम योजतात असे दिसून येते• ६•६७% प्रतिसादकांनी नकारात्मक उत्तर दिले आहे• त्यांना मूल्यसंक्रमणाची संकल्पना समजलेली आहे की नाही याबाबत शंका वाटते• किंवा त्यांच्या मते मूल्यसंक्रमणासाठी केवळ पाठयपुस्तक हे साधन पुरेसे आहे असे वाटते• असे जर त्यांना वाटत असेल तरी मूल्यांच्या संक्रमणासाठी वातावरणाची आवश्यकता असते आणि ते वातावरण अभ्यासपूरक कार्यक्रमातून निर्माण होते• त्या प्रसंगातून, कृतिमधून विद्यार्थ्यांच्या वृत्ती जोपासता येतात हा मानसशास्त्रीय दृष्टीकोन या गटातील शिक्षकांनी समजून घेतला पाहिजे•

अभ्यासपूरक कार्यक्रमातून मूल्ये संक्रमित करता येतात• या उद्देशाने ज्या प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे त्यांच्या करिता प्रश्नावलीतील प्रश्न क्र•१६ मध्ये असा प्रश्न विचारलेला होता की आपण योजत असलेले अभ्यासपूरक उपक्रम कोणते व त्यातून कोणती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये बिंबवू इच्छिता अशी यादी तयार करण्यास सांगितले होते• या प्रश्नास ज्या प्रतिसादकांनी प्रतिसाद दिलेला आहे याची नोंद सारणी क्रमांक ५•१२ मध्ये केलेली आहे•

सारणी क्रमांक ५•१२

शाळेत योजत असलेले अभ्यासपूरक उपक्रम व त्यातून विद्यार्थ्यांमध्ये बिंबवू इच्छिणारी मूल्ये

| अ•नं• | उपक्रमाचे नांव | बिंबवू इच्छिणारी मूल्ये | वारंवारिता |
|---|---|---|---|
| १• | प्रार्थना | संयम, आत्मबल, धाडस | ३५ |

सारणी क्रमांक ५•१२ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | उपक्रमाचे नांव | बिंबवू इच्छिणारी मूल्ये | वारंवारिता |
|---|---|---|---|
| | | आत्मविश्वास, सहिष्णुता, शांती• | |
| २• | परिसर स्वच्छता | स्वच्छता, प्रसन्नता, बंधुभाव | १० |
| ३• | राष्ट्रीय सण | राष्ट्राभिमान, देशप्रेम | २८ |
| ४• | थोरांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या | अहिंसा, सत्य, प्रेम, सेवा आदर | २१ |
| ५• | सांस्कृतिक सण | सहानुभूति, बंधुभाव, संस्कृति प्रेम | १९ |
| ६• | सहल | निसर्गप्रेम, सहकार्य, धाडस | १५ |
| ७• | शालेय स्वराज्य | कर्तव्यनिष्ठा, नेतृत्व निर्णय-शक्ती, संघवृत्ती | १३ |
| ८• | सहकारी भांडार | सचोटी, सहकार्य, प्रामाणिकपणा | १० |
| ९• | संचयिका | संग्रवृत्ती जोपासने नियोजनक्षमता | ९ |
| १०• | विविध स्पर्धा | खिलाडूवृत्ती, सृजनशीलता सहकार्य | ७ |

सारणी क्रमांक ५•१२ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | उपक्रमाचे नांव | बिंबवू इच्छिणारी मूल्ये | वारंवारिता |
|---|---|---|---|
| ११• | गीतमंच | देशप्रेम, सामाजिक बांधिल्की मनोरंजन, व्यासंग, सद्भिरुची | ६ |
| १२• | बालसभा | नेतृत्व, नियोजनक्षमता, निर्णय क्षमता• | ४ |
| १३• | छंद मंडळ | सृजनशीलता, संग्रहवृत्ती | २ |
| १४• | विज्ञान मंडळ | वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुध्दता, जिज्ञासा, सृजनशिलता• | २ |
| १५• | स्काउट गाईड | स्वावलंबन, सौंदर्यदृष्टी, शौर्य शिस्त | २ |
| १६• | हस्तलिखित | सृजनशिलता, सौंदर्यदृष्टी, कल्पकता, जिज्ञासा | २ |
| १७• | गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार | स्वाभिमान, सचोटी, आदर्श | २ |
| १८• | प्रदर्शन भरवणे | सृजनशीलता, कल्पकता अभिरुची, ज्ञानसंवर्धन | १ |
| | | एकूण •• | २०८ |

वरील सारणी क्रमांक ५•१२ मध्ये " प्रार्थना " या अभ्यासपूरक

उपक्रमातून मुलींमध्ये मूल्ये अधिक प्रमाणात संक्रमित करता येतात असे दिसून येते. प्रत्येक शाळेमध्ये प्रत्येक दिवशी शालेय कामकाज सुरू होते ते प्रार्थना या उपक्रमातून त्यामुळे हा उपक्रम महत्वाचा वाटतो.

अनेक शाळांमधून परिसर स्वच्छता, राष्ट्रीय सण, थोर व्यक्तींच्या जयंत्या, सांस्कृतिक सण, सहल, शालेय स्वराज्य इत्यादी उपक्रम अनेक शाळांमध्ये घेतले जातात असे आढळून येते. विविध स्पर्धा, बालसभा, छंद मंडळ, गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार, प्रदर्शन भरवणे हे उपक्रम चांगले आहेत. पण हे उपक्रम कमी प्रमाणात घेतले जातात असे दिसून येते, याचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे.

शाळेमध्ये सध्या योजत असलेल्या उपक्रमांखेरीज आणखी कोणते उपक्रम आयोजित करता येतील ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १७ याची योजना केलेली होती. या प्रश्नास प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.१३ मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.१३

शाळेत योजता येतील असे अन्य उपक्रम

| अ.नं. | उपक्रमाचे नाव | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | समान गणवेश | ४० | १७.३३ |
| २. | परिसर अभ्यास | ३० | १२.९९ |
| ३. | शिक्षक पालक मेळावा आयोजित करणे. | २० | ८.६६ |

सारणी क्रमांक ५•१३ .... पुढे चालू ...

| अ•नं• | उपक्रमाचे नांव | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ४• | कथा - कथन | १८ | ७•७९ |
| ५• | सामाजिक स्तरावरील सण - समारंभामध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणे• | १५ | ६•४९ |
| ६• | वनमहोत्सव, वृक्षदिंडी | १२ | ५•१९ |
| ७• | आरोग्य सप्ताह | १० | ४•३३ |
| ८• | विद्यार्थी दिन | १० | ४•३३ |
| ९• | दैनंदिनीची सवय | ८ | ३•४६ |
| १०• | संस्कारक्षम चित्रपटाचे दिग्दर्शन | ८ | ३•४६ |
| ११• | आदर्श विद्यार्थी निवड | ७ | ३•०३ |
| १२• | आपदग्रस्त मदत योजना | ६ | २•६० |
| १३• | संस्कारयुक्त पुस्तकांचे सामुहिक वाचन | ६ | २•६० |
| १४• | आंतर शालेय क्रीडास्पर्धा | ६ | २•६० |
| १५• | वर्ग सजावट | ५ | २•१६ |
| १६• | उपकरणांची निर्मिती | ५ | २•१६ |
| १७• | ग्रंथदिंडी | ५ | २•१६ |
| १८• | गरीब व आजारी व्यक्तींना मदत | ४ | १•७३ |
| १९• | कमवा आणि शिका योजना | ४ | १•७३ |
| २०• | संस्कार वर्ग चालविणे | ४ | १•७३ |

सारणी क्रमांक ५•१३ ••• पुढे चालू •••

| अ•नं• | उपक्रमाचे नांव | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २१• | नेहरु ज्योत काढणे | २ | •८७ |
| २२• | सद्भावना दिन साजरा करणे | २ | •८७ |
| २३• | मानवतासाखळी बनविणे | २ | •८७ |
| २४• | स्नेहसंमेलन घेणे | २ | •८७ |
| | एकूण •• | २३१ | १००•०० |

टीप : वरील सारणी क्रमांक ५•१३ मध्ये एका शिक्षकांनी अन्य अधिक उपक्रम सुचविल्याने एकूण प्रतिसाद संख्या २३१ झालेली आहे•

वरील सारणी क्रमांक ५•१३ मधील अनुक्रमांक १ मध्ये ६० पैकी ४० शाळामधून समान गणवेशाची अंमलबजावणी केली जाते असे दिसून येते, समान गणवेशामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये समतेची, एकात्मतेची भावना निर्माण होते• त्यामुळे अधिकतम शाळांमधून हा उपक्रम सक्तीचा केला जातो•

अनुक्रमांक २ मध्ये ६० पैकी ३० प्रतिसादकांनी परिसर अभ्यास या उपक्रमाला महत्व दिलेले दिसून येते• नवीन अभ्यासक्रमामध्ये परिसर अभ्यासाला महत्वाचे स्थान दिलेले आहे• यामुळे विद्यार्थ्याला आपल्या परिसरातील लोकजीवन, भौतिक साधने यांचा परिचय होतो• या उपक्रमातून सहानुभूति, सहकार्य, बंधुभाव व समतेची भावना निर्माण होण्यास मदत होते•

सारणी क्रमांक ५•१३ मधील अनुक्रमांक ३ मध्ये ६० पैकी २० प्रतिसादकांनी शिक्षक पालक मेळावा आयोजित करण्याचा उपक्रम घेतला जातो असे म्हटले आहे• या मेळाव्यामुळे पालकांना घरी संस्कारक्षम वातावरण कसे निर्माण करता येईल ? याविषयी उद्‌बोधन करता येईल• पालकांच्या जबाबदाऱ्या कोणत्या याची त्याना कल्पना देता येईल• मूल्य संक्रमणासाठी शाळा कोणकोणते उपक्रम राबवते याची माहिती देता येईल• म्हणून शिक्षक-पालक मेळाव्याचे महत्व स्पष्ट केले आहे•

अनुक्रमांक ४ मध्ये ६० पैकी १८ प्रतिसादकांनी मुलांच्यावर संस्कार करण्यासाठी कथा-कथन हा उपक्रम सुचविला आहे• तीनदिवसा आड अगर आठवड्यामध्ये एक दिवस निवडून काही वेळ शिक्षकांकडून कथा सांगितल्या जाव्यात असे म्हटले आहे• कथेमधील पात्राचा विद्यार्थ्यांच्या मनावर मूल्यारोपनासाठी होईल असे मत व्यक्त केले आहे•

सण, समारंभ, उत्सव अशावेळी विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून जबाबदारी दिल्यास, सामाजिक बांधिलकी, सेवा, नेतृत्व या गुणांचा विकास होईल असे ६० पैकी १५ प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले आहे•

सारणी क्रमांक ५•१३ मध्ये समान गणवेश, परिपाठ, परिसर अभ्यास शिक्षक-पालक मेळावा, कथा-कथन यासारखे उपक्रम अनेक शाळा मधून राबविले जातात असे दिसून येते•

रोजनिशी लेखन, आंतरशालेय क्रीडास्पर्धा, वर्ग सजावट, उपकरणांची निर्मिती यासारखे उपक्रम मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत• पण या उपक्रमांचा प्रतिसाद कमी प्रमाणात दिसून येतो• सध्या देशापुढील कांही ज्वलंत समस्या आहेत• सामाजिक एकात्मता अखंड भारत

यासाठी काही शाळामधून नेहरु ज्योत, सद्भावना दिन, मानवता साखळी हे उपक्रम घेणे महत्वाचे आहेत. असे उपक्रम काही शाळामधून राबविले जातात. हेच उपक्रम प्रत्येक शाळेने राबविण्यासारखे आहेत असे वाटतात.

## ५.७ मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांनी सहभाग घेतलेल्या कृतिसत्र/शिबिराची माहिती :

मूल्य शिक्षणाच्या संदर्भात इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना मराठीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी एखाद्या कृतिसत्रास अगर शिबिरामध्ये भाग घेतला होता का ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १८ विचारलेला होता. या प्रश्नाची योजना केलेली होती. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.१४ मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.१४

मूल्य शिक्षण कृतिसत्र / शिबीर यातील सहभागाबाबत

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १४ | २३.३३ |
| २. | नाही | ४६ | ७६.६७ |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

एकूण ६० प्रतिसादकांपैकी फक्त १४ प्रतिसादकांनी (२३•३३%) "होय" प्रतिसाद दिलेला आहे• तर ४६ प्रतिसादकांनी (७६•६७%) "नाही" असा प्रतिसाद दिलेला आहे• या सारणीवरून असे म्हणता येईल की, मूल्य शिक्षणाच्या संदर्भात थोड्या प्रमाणातच शिक्षकांना कृतिसत्रामध्ये भाग घेण्याची संधी मिळते• वस्तु: नवीन शैक्षणिक धोरण, किमान अध्ययन क्षमता यांचे कृतिसत्र सर्व शिक्षकांसाठी आवश्यक आहे• शिक्षण संचालकनालयाने सर्व शिक्षकांना अशा कृतिसत्राची संधी उपलब्ध करून द्यावी असे वाटते• काही शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये छात्रसेवा शिबीर व समाजसेवा कॅम्प यामधून काही अनुभूति मिळालेल्या आहेत• या सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये असल्याने सारणी क्रमांक ५•१४ मध्ये त्यांचा उल्लेख केलेला नाही•

ज्या शिक्षकांनी मूल्य शिक्षणाच्या संदर्भात झालेल्या कृतिसत्रामध्ये अगर शिबीरामध्ये भाग घेतलेला होता, त्यांच्यासाठी प्रश्नावलीमध्ये प्रश्नक्रमांक १९ ते २३ ची योजना केलेली होती• या मध्ये कृतिसत्रामध्ये भाग घेतल्यास त्याचे नाव कोणते ? कृतिसत्र कोणी आयोजित केले होते ? कृतिसत्राचा कालावधी किती दिवसाचा होता? कृतिसत्रामध्ये नेमके कोणते प्रशिक्षण देण्यात आले ? कृतिसत्र मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अधिक परिणामकारक होण्यासाठी कोणत्या सूचना करू इच्छिता ? या संबंधात प्रश्नांची विचारणा केली होती•

वरील सर्व प्रश्नांना मिळालेल्या प्रतिसादांची नोंद सारणी क्रमांक ५•१५ मध्ये केलेली आहे•

| अ.नं. | कृतिसत्र/शिबिराचे नांव | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- |
| १. | किमान अध्ययन क्षमता | २८.५७ |
| २. | नवीन अभ्यासक्रम अध्यापन पद्दती | २१.४३ |
| ३. | नवीन शैक्षणिक धोरण | १४.२९ |
| ४. | भाषा विषयाचे अध्यापन | १४.२९ |
| ५. | सृजन आनंद वर्ग | ७.१४ |
| ६. | मूल्य शिक्षण कृतिसत्र | ७.१४ |
| ७. | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक | ७.१४ |
| | | १.०० |

सारणी क्रमांक ५•१५ मध्ये ६० पैकी १४ शिक्षकांना कृतिसत्राचा लाभ झालेला दिसून येतो• एकूण प्रतिसादाच्या तुलनेने हे प्रमाण २३•३३% इतके आहे• यावरून असे दिसून येते की, ४६ शिक्षकांना एकाही कृतिसत्रामध्ये भाग घेता आला नाही• सर्व शिक्षकांना सेवातंर्गत शिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षण मिळाले पाहिजे• नवे शैक्षणिक धोरण १९८६ पासून अमलात येत आहे• पण त्याबाबतचे प्रशिक्षण सर्व शिक्षकांना झालेले दिसून येत नाही•

प्रश्नावलीमध्ये प्रश्नक्रमांक २१ मध्ये ज्या शिक्षकांनी कृतिसत्रामध्ये भाग घेतलेला होता• अशा शिक्षकांना कृतिसत्र परिणामकारक होण्याच्या दृष्टीने काही सूचना करावयास सांगितल्या होत्या• या सूचना एकत्रित स्वरूपात सारणी क्रमांक ५•१६ मध्ये दिलेल्या आहेत•

सारणी क्रमांक ५•१६

कृतिसत्र परिणामकारक होण्यासाठी सुचविलेल्या सूचना

| अ•नं• | सूचनेचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | केवळ मूल्यशिक्षणावर आधारित शिबीर द्यावे• | ८ | ३२•०० |
| २• | कृतिसत्राचा कालावधी वाढवावा (किमान ८ ते १५ दिवस) | ६ | २४•०० |
| ३• | कृतिसत्रामध्ये मूल्यधिष्ठीत पाठ दिग्दर्शित करावे• | ५ | २०•०० |

सारणी क्रमांक ५•१६ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | सूचनेचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ४• | मार्गदर्शन केवळ पुस्तकी ज्ञानावर होते व्यवहाराशी सांगड घालावी• | ४ | १६•00 |
| ५• | कृतिसत्रामधील मार्गदर्शक ग्रामीण व शहरी अनुभव असलेले हवेत | २ | ८•00 |
| | एकूण •• | २५ | १00•00 |

सारणी क्रमांक ५•१६ मध्ये शिक्षकांनी मूल्यशिक्षण कृतिसत्राच्या परिणामकारकते बाबत कांही सूचना दिलेल्या आहेत• शिक्षकांचे वेगवेगळ्या विषयावर कृतिसत्र होते पण केवळ मूल्यशिक्षणावर आधारित कृतिसत्रे होत नाहीत• तशी ती व्हावीत• मूल्य शिक्षणावरचे कृतिसत्र ८ ते १0 दिवसाचे असावे• मूल्यशिक्षण कृतिसत्रामध्ये मूल्याधिष्ठीत पाठांचे दिग्दर्शन व्हावे अशा प्रमुख सूचना शिक्षकांनी व्यक्त केलेल्या आहेत• अध्यापकांनी सूचविलेल्या या सूचना मान्य करण्यास हरकत नाही•

## ५•८ मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन :

मूल्ये संक्रमित करता येतात असे बहुतांश शिक्षकांचे मत आहे• मूल्ये संक्रमित झाल्यानंतर त्यांचे मूल्यमापन करतांना मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध जोडत येईल का असा बंदिस्त स्वरूपाचा "होय", "नाही" असा प्रश्न प्रश्नावलीमध्ये क्रमांक २४ मध्ये विचारलेला होता• या प्रश्ना-

साठी दिलेला प्रतिसाद खालील सारणी क्रमांक ५•१७ मध्ये दिलेला आहे•

सारणी क्रमांक ५•१७

मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा का या बाबत

| अ•नं• | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | होय | ५२ | ८६•६७ |
| २• | नाही | ८ | १३•३३ |
| | एकूण •• | ६० | १००•०० |

मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा असे ६० पैकी ५२ प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले आहे• तर ८ प्रतिसादकांनी नकार दर्शविलेला आहे• संबंध जोडावा म्हणणा-याचे मत आहे की ज्या गोष्टी बाबत गुणदान असते त्याची पूर्तता विद्यार्थ्यांकडून त्वरीत होते• तर नकारात्मक ; मत व्यक्त करणारे शिक्षक म्हणतात मूल्ये ही परीक्षेच्या भितीने किंवा सक्तीने न रूजवता तो त्यांच्या स्वभावाचा भाग बनावा• परीक्षेचा संबंध न मानता मूल्ये संक्रमित करणे हा कोणत्याही शिक्षणाचा गाभा समजून, कर्तव्य भावनेने ती शिक्षकाने रूजविण्याचा प्रयत्न केला पाहिजे•

मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध कसा जोडावा या संबंधी प्रश्नावलीमध्ये प्रश्नक्रमांक २५ वर प्रश्न विचारलेला होता• या संबंधी मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५•१८ मध्ये दिलेला आहे•

## सारणी क्रमांक ५.१८

## मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध कसा जोडावा

| अ.नं. | परीक्षणाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रश्न पत्रिकेत प्रश्न विचारावेत | १८ | ३१.०३ |
| २. | वार्षिक सर्वंकषस्वरूपाचे निरीक्षण करून | १५ | २५.८६ |
| ३. | अंतर्गत मूल्यमापनामध्ये वर्तनाचे परीक्षण करावे. | १२ | २०.६९ |
| ४. | तोंडी प्रश्न विचारून | ८ | १३.७९ |
| ५. | चाचणीद्वारे | ५ | ८.६२ |
| | एकूण .. | ५८ | ९९.९९ |

वरील सारणी क्रमांक ५.१८ मध्ये मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंधाबाबत प्रतिसादकांनी प्रश्नपत्रिकेत प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या मूल्यसंक्रमणाची खात्री देता येईल असे म्हटले आहे. पण नैतिक प्रश्नांचे उत्तर चांगले लिहिणारा विद्यार्थी त्याप्रमाणे नैतिक आचरण करेल असे अनुमान काढता येणार नाही. नैतिकता हा स्वभावधर्म आहे. वार्षिक सर्वंकषस्वरूपाचे निरीक्षण करून गुणपत्रिकेमध्ये त्यांनी नोंद करता येईल.याला दिलेला प्रतिसाद कांही अंशी मान्य करण्यास हरकत नाही.असे वाटते. विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन करूनही गुणदान करता येईल.

मूल्ये संक्रमित झाली आहेत की, नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीमधील प्रश्नक्रमांक २६ मध्ये प्रश्न दिलेला होता. मूल्ये संक्रमित झाली आहेत की, नाही याचे मूल्यमापन करावे काय ? या प्रश्नाची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा असून याचे उत्तर होय अगर नाही स्वरूपाचे होते. सदर प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादकांकडून जो प्रतिसाद आहे तो सारणी क्रमांक ५.१९ या मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.१९

मूल्ये संक्रमित झाली आहेत की, नाही यांच्या मूल्यमापना बाबत

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ५४ | ९०.०० |
| २. | नाही | ६ | १०.०० |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ५.१९ मध्ये ६० पैकी ५४ प्रतिसादकांनी (९०%) होकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. यावरून असे दिसून येते की, अधिकतम शिक्षकांचे मत मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याचे मूल्यमापन करावे असे मत व्यक्त केले आहे. हे त्यांचे मत मान्य करण्यास हरकत नाही. असे वाटते.

६० पैकी ६ प्रतिसादकांनी नकारात्मक मत नोंदविलेले आहे. यांनी संक्रमित मूल्यांचे मूल्यमापन करता येणार नाही असे म्हटले आहे. प्रश्नावलीमध्ये ज्या प्रतिसादकांनी नकार नोंदविलेला आहे त्यांच्यासाठी प्रश्न क्रमांक २७ मध्ये प्रश्न दिलेला होता. संक्रमित मूल्यांचे मूल्यमापन का करता येणार नाही त्याची कारणे कोणती ? पण ६ पैकी एकाही प्रतिसादकांनी कारणाची नोंद केलेली नाही. यावरुन असे म्हणता येईल की, मूल्ये सहजगत्या संक्रमित होत असतात. त्यामुळे त्यांचे निश्चित मूल्यमापन करता येणार नाही असा प्रतिसादकांचा विचार असेल.


मूल्ये किती प्रमाणात रुजली आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २८ विचारला होता. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.२० मध्ये मांडलेला आहे.

सारणी क्रमांक ५.२०

मूल्ये किती प्रमाणात रुजली आहेत याचे मूल्यमापना संबंधीचा प्रतिसाद

| अ.नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ४५ | ७५.०० |
| २. | नाही | १५ | २५.०० |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

आकृती क्रमांक ५.२१.




A-1 paper products Bombay

वरील सारणी क्रमांक ५•२० मध्ये ६० पैकी ४५ प्रतिसादकांनी (७५%) प्रतिसाद होकारार्थी दिलेला आहे• मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात रुजली आहेत याचे निश्चित प्रमाणात मूल्यमापन करता येते असे म्हटले आहे•

६० पैकी १५ प्रतिसादकांनी (२५%) नकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे• याचे असे मत आहे की, मूल्यांचे संक्रमण होते पण त्यांचे निश्चित असे प्रमाण ठरविता येणार नाही• मूल्यांचे मूल्यमापन करता येईल पण स्थूल मानाने करता येईल• एखाद्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या प्रासंगिक नोंदी वरून त्यांच्या वर्तनाबाबत आपण अनुमान काढतो पण तो गुणधर्म त्याच्यावृत्तीमध्ये कायम राहील असे सांगता येणार नाही• त्यावरून २५% प्रतिसादकाचे मत पटण्यासारखे आहे•

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २९ मध्ये मूल्यांचे मूल्यमापन कसे करता येईल हे जाणून घेण्यासाठी प्रश्नाची योजना केलेली होती• या साठी प्रतिसादकांनी मूल्यांचे मूल्यमापन वेगवेगळ्या प्रकारे करता येईल असे सांगून वेगवेगळे मार्ग सांगितलेले आहेत• मिळालेल्या प्रतिसादावरून समान आशयाचे प्रतिसाद एकत्र करून मूल्यांचे मूल्यमापन कसे करता येईल ते पुढील सारणी क्रमांक ५•२१ मध्ये नमूद केलेले आहे•

सारणी क्रमांक ५•२१

मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग

| अ•नं• | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | पुढील ठिकाणी विद्यार्थ्यांच्या | ३५ | ५८•३३ |

सारणी क्रमांक ५•२१ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| | वर्तनाचे निरीक्षण करून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल•--शाळा, समाज, कुटुंब | | |
| २• | पुढील उपक्रमांच्या नियोजनातून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• उदा• परिपाठ, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, सहभोजन, मुलाखत, अनौपचारिक चर्चा, संभाषण, अशा उपक्रमावर आधारीत पदनिश्चयनश्रेणी वापरून मूल्यमापन करता येईल• | ३२ | २१•६२ |
| ३• | विद्यार्थ्यांच्या संकलित नोंदपत्रकावरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | २३ | १५•५४ |
| ४• | विद्यार्थ्यांवर सोपविलेल्या जबाबदारी-वरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | १८ | १२•१६ |
| ५• | समाजमिती व प्रक्षेपन तंत्राचा वापर करून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | १५ | १०•१४ |
| ६• | विद्यार्थ्यांच्या दैनंदिनी (रोजनिशी) पाहून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | १२ | ८•११ |

सारणी क्रमांक ५•२१ .... पुढे चालू ...

| अ•नं• | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ७• | विद्यार्थ्यांच्या पालकांशी वारंवार संपर्क ठेवून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | ८ | ५•४१ |
| ८• | विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंध लेखना-वरून, चित्ररेखाटनावरून, वक्तृत्वावरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल• | ५ | ३•३८ |
| | | १४८ | १००•०१ |

टीप : प्रश्नावलीना प्रतिसाद देणा-या शिक्षकांपैकी कांही शिक्षकांनी एकाहून अधिक मार्ग सुचविलेल्यामुळे प्रतिसादक संख्येची बेरीज ६० हून अधिक झालेली आहे•

सारणी क्रमांक ५•२१ मधील अनुक्रमांक १ मध्ये विद्यार्थ्यांचे शाळा, समाज, कुटुंब या ठिकाणच्या वर्तनाचे निरीक्षण करून मूल्याचे मूल्यमापन करता येईल असे मत १४८ पैकी ३५ प्रतिसादकांनी ( २३•६५% ) व्यक्त केले आहे•

"वर्तनातील सुयोग्य बदल म्हणजे शिक्षण" अशी शिक्षणाची व्याख्या केली जाते• शालेय विषयांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षक प्रयत्न करीत असतात• परंतु ही उद्दिष्टे साध्य करीत असताना सद्गुणांची जोपासना करणे म्हणजेच मूल्यारोपण करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे,

आणि या मूल्यांचे मूल्यमापन हे त्यांच्या वर्तनातील बदलाच्या निरीक्षणाने करणे क्रमप्राप्त होते. वर्तनाचे निरीक्षण करावयाचे झाल्यास विद्यार्थ्यांचा वापर कोठे कोठे असतो हे ओळखून त्यावेळचे निरीक्षण केले पाहिजे. शाळा, समाज, कुटुंब या ठिकाणी विद्यार्थी कसा वागतो ? हे पाहून आपला अभिप्राय व्यक्त केला पाहिजे. हे मूल्यमापन केवळ शाळेच्या आवारातील विद्यार्थ्यांचे वर्तन पाहून न करता तो समाजात कसा वागतो या बाबत त्याच्या शेजारी राहणा-या व्यक्तींना निरीक्षण करण्यास सांगावे, तसेच त्याच्या मित्रांचे मत अजमावता येईल, कुटुंबात तो कसा वागतो हे घरच्या व्यक्तींकडून समजू शकेल. या सर्वांच्या निरीक्षणावरुन विद्यार्थ्यांमधील मूल्यांचे मूल्यमापन करता येणे शक्य आहे. सबब शिक्षकांनी सुचविलेला मार्ग पटण्यासारखा आहे.

अनुक्रमांक २ मध्ये ३२ शिक्षकांनी (२१.६२%) पुढील उपक्रमांच्या नियोजनातून पदनिश्चयन श्रेणीद्वारे मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असा मार्ग सुचविलेला आहे. या पदनिश्चयन श्रेणीमध्ये उत्तम, चांगले, मध्यम, अल्प, अत्यल्प अशा श्रेणी देवून नोंदी ठेवता येतील.

प्रार्थनेच्यावेळी कोणते विद्यार्थी नियमित असतात, प्रार्थना किती मनोभावे करतात, चिंतनपर भाषणांचा दैनिकामधील बातम्यांचा विद्यार्थ्यांवर कोणता परिणाम होतो. याचे निरीक्षण करता येते. क्रीडास्पर्धेच्या वेळी, खिलाडूवृत्ती, जोश, संघप्रवृत्ती, एकात्मता, निस्पृहता इत्यादी गुणांची तपासणी करता येते. सांस्कृतिक कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागावरुन, सहभोजनाच्यावेळी त्यांच्या मित्राबरोबरचे वागणे, संभाषण, मुलाखतीतून त्याची एखाद्या विषयाची आवड, कल, वृत्ती या विषयी मत

व्यक्त करून मूल्यांचे मूल्यमापन करता येते. प्रतिसादकांचे हे मतसुद्धा मान्य करण्यास हरकत नाही असे वाटते.

सारणी क्रमांक ५.२१ मधील अनुक्रमांक ३ मध्ये २३ प्रतिसादकांनी (१५.५४%) विद्यार्थ्यांच्या संकलित नोंदपत्रकावरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असा मार्ग सुचविलेला आहे.

संकलित नोंदपत्रकामध्ये विद्यार्थ्यां संबंधी संपूर्ण माहिती संकलित केलेली असते. या नोंदपत्रकामध्ये वेळोवेळी अद्यावत नोंदी ठेवणे महत्वाचे असते. विद्यार्थ्यांची व्यक्तिगत माहिती, कौटुंबिक माहिती, पूर्वी कोणत्याशाळेत होता, तेथील त्याचे वर्तन कसे होते. आताच्याशाळेतील त्याच्या प्रवेशा पासूनचे आचार, विचार याची माहिती संकलित नोंद पत्रकामध्ये असते. शाळा सोडून जाते वेळी या संकलित नोंदपत्रकावरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. यावेळी पडताळा सूची, पदनिश्चियन श्रेणीचा वापर करता येईल. संकलित नोंदपत्रकातील नोंदी सात किंवा अधिक वर्षांमधल्या असल्याने यामधील नोंदी विश्वासनिय मानण्यास हरकत नाही. नोंदी करणाऱ्या व्यक्तींनी या नोंदी वस्तुनिष्ठतेने करणे महत्वाच्या आहेत. मूल्यांच्या मूल्यमापनासाठी सुचविलेला हा मार्ग योग्य आहे असे वाटते.

सारणी क्रमांक ५.२१ मधील अनुक्रमांक ४ मध्ये १८ प्रतिसादकांनी (१२.१६%) विद्यार्थ्यांवर काही जबाबदाऱ्या पार पाडण्यास सांगाव्यात व त्यामधून त्यांच्यामधील मूल्यांचे मूल्यमापन करता येईल हा मार्ग सुचविलेला आहे.

वर्ग सजावट, संघ नायक, स्नेहसंमेलन अशा वेळी विद्यार्थ्यांवर

वेगवेगळया जबाबदा-या सोपवाव्यात. त्या कार्यातील विद्यार्थ्यांचा स्वभाव, निर्णयशक्ती, समायोजनक्षमता, नेतृत्व, सौंदर्यदृष्टी, इत्यादीची पारख करुन मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असे कांही शिक्षकांचे मत आहे. याही वेळेस निरीक्षण तत्कालीन व वस्तुनिष्ठतेने करणे महत्वाचे आहे. सदरचा मार्ग कांही प्रमाणात वापरण्यास हरकत नाही असे वाटते.

अनुक्रमांक ५ मध्ये समाजमिती व प्रक्षेपन तंत्राचा वापर करुन विद्यार्थ्यांमधील मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असा १५ प्रतिसादकांनी (१०.१४%) मार्ग सुचविलेला आहे.

विद्यार्थ्यांचा जवळचा समाज म्हणजे त्यांचे वर्गमित्र या वर्गमित्रांच्या सानिध्यात विद्यार्थ्यांचा बराच काळ व्यस्त होतो. त्यादृष्टी - कोनातून त्याचा स्वभाव ओळखण्यासाठी त्यांच्या मित्राचा अभिप्राय महत्वाचा असतो. परस्परांची मते अजमावण्यासाठी समाजमिती किंवा नामनिर्देश तंत्राचा वापर करता येतो. यावरुन मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. प्रक्षेपण तंत्राचा वापर मानसशास्त्रज्ञ करीत असतात. कांही व्यक्ती मितभाषी असतात. त्यामुळे त्यांच्या स्वभावाची पारख करणे अवघड जाते. यासाठी त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मनातील विचार काढून घेणे महत्वाचे असते. या साधनाचा वापर विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा शोध घेता येईल. त्याला त्याच्या उन्नतिसाठी शिक्षकांना प्रयत्न करता येईल. मूल्यांच्या मूल्यमापनासाठी समाजमिती व प्रक्षेपण तंत्राचा वापर कांही अंशी करण्यास हरकत नाही असे दिसून येते.

सारणी क्रमांक ५.२१ मधील अनुक्रमांक ६ मध्ये १२ प्रतिसादकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या रोजनिशी वरुन मूल्यांचे मूल्यमापन करता येईल

असा मार्ग सुचविलेला आहे. विद्यार्थ्यांनी रोजनिशी नियमित लिहिली पाहिजे. स्वतःशी प्रामाणिक राहून विद्यार्थ्यांनी या नोंदी केलेल्या असल्या पाहिजेत. अन्यथा तो एक काल्पनिक निबंध होईल. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या दैनंदिनीवरून कांही प्रमाणात मूल्यांचे मूल्यमापन करण्यास हरकत नाही.असे वाटते.

अनुक्रमांक ७ मध्ये ८ प्रतिसादकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांशी वारंवार संपर्क ठेवून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असे म्हटले आहे. पालकांशी संपर्क ठेवल्याने शाळा व घर येतील वातावरण संस्कारक्षम ठेवण्यासाठी शिक्षक - व पालक या दोघाना प्रयत्न करता येईल. विद्यार्थ्यांचे शाळेतील वर्तन व तत्सम घरातील वर्तन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थिरभाव निर्माण होऊन मूल्यांचे दृढीकरण होईल. हा विचार करून प्रतिसादकांनी सुचविलेला पालकसंपर्क मार्ग थोड्याप्रमाणात स्विकारावा असे वाटते.

अनुक्रमांक ८ मध्ये ५ प्रतिसादकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधावरून चित्ररेखाटनावरून त्यांच्या मधील मूल्याचा शोध घेता येतो असे म्हटले आहे. एखाद्या विद्यार्थी निबंध उत्तमप्रकारे लिहू शकेल, आणि तो त्या निबंधातील विचाराप्रमाणे वागू शकत नसेल तर हे साधन अयोग्य आहे.असे म्हणता येईल. निबंधामधील विचार काल्पनिकही असू शकतील. चित्र रेखाटनावरून विद्यार्थ्यांच्या कौशल्यात्मक मूल्यांचे मूल्य-मापन करता येईल. पण भावनिक पातळीवरचे मूल्य निश्चित सांगता येणार नाही. सबब हे साधन कांही विद्यार्थ्यांसाठी, थोड्या प्रमाणात वापरावे असे वाटते.

## ५.९ <u>प्रस्तुत संशोधनासंबंधी अन्य उपयुक्त माहिती</u> :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्रश्नावलीमध्ये विचारण्यात न आलेली माहिती परंतु संशोधनासाठी उपयुक्त ठरेल यासंबंधी प्रश्नक्रमांक १० ची योजना केलेली होती. " प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात वर विचारण्यात न आलेली तथापि प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरेल अशी काही माहिती द्यावयाची झाल्यास ती खालील रिक्त जागेत लिहावी."

या प्रश्नाला प्रतिसाद काही नेमक्या अध्यापकांनी दिलेला आहे. यांनी दिलेल्या माहितीवजा सूचना खालील प्रमाणे आहेत.

१. मूल्यशिक्षणामध्ये शिक्षकाचा आचार अत्यंत महत्वाचा आहे.

२. मूल्यशिक्षणाबाबतीत सेवांतर्गत प्रशिक्षण द्यावे.

३. संस्कार हे केवळ बौद्धिक स्वरुपाचे न राहता कृतियुक्त बनले पाहिजेत.

४. सर्व समाजच मूल्यहीणतेकडे जात आहे. अशा परिस्थितीत मूल्यसंक्रमण अत्यंत अवघड झाले आहे.

५. मूल्यांचेरोपन हे दूरगामी स्वरुपाचे असल्याने मूल्यांकण सहजशक्य नाही.

<u>सूचना क्रमांक १</u> : या सूचनेमध्ये प्रतिसादकाचे असे मत झालेले आहे की, केवळ शिक्षकच मूल्यारोपन करतो. पण समाजातील सर्व मानवी घटकाकडून मूल्यानीयुक्त असे जेंव्हा वातावरण निर्माण होईल तेंव्हा मूल्यारोपन शक्य होईल. या मानवी घटकामध्ये शिक्षक हा महत्वाचा आणि कृतिशील घटक आहे. शिक्षकाचा आचार आदर्श असलाच पाहिजे. कारण विद्यार्थी त्याचे अनुकरण करतात. आजचा शिक्षक

व्यवहारवादी बनत चालला आहे. त्यामुळे शिक्षकांनी पुरवलेली सदरची सूचना सद्यस्थितीला अत्यंत महत्वाची आहे.

<u>सूचना क्रमांक २</u> : शिक्षकाचे विविध विषयावर सेवांतर्गत प्रशिक्षण होते. पण मूल्यशिक्षणावरचे प्रशिक्षण क्वचित मिळते. यांचे प्रमाण वाढविण्याची आवश्यकता आहे असे कांही शिक्षकांनी सुचविलेले आहे.

<u>सूचना क्रमांक ३</u> : संस्कार हे केवळ बौध्दिक स्वरूपाचे न राहता ते कृतियुक्त बनावे असे या सूचनेमध्ये सूचित केलेले आहे. शिक्षकाकडून किंवा कुटुंबातील व्यक्तीकडून केवळ शाब्दिक स्वरूपात संस्कार केले जातात. पण त्याला कृतिची जोड नसते. विचाराबरोबर आचारालाही महत्व आहे. असे प्रतिसादकांना सूचवायचे आहे हे मत कोणीही मान्य करण्यासारखे आहे.

<u>सूचना क्रमांक ४</u> : सर्व समाजच मूल्यहीणतेकडे जात आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत मूल्यसंक्रमण अवघड झाले आहे. याला सर्व समाजच कारणीभूत आहे. मूल्यांचा स्विकार समाजाकडून झाला नाही, तर समाजाला स्थैर्य लाभणार नाही. समाज अस्थिर बनून यादवी माजेल. म्हणून मूल्यांचा स्विकार महत्वाचा आहे, ही सूचना मौलिक स्वरूपाची आहे.

<u>सूचना क्रमांक ५</u> : मूल्यांचे रोपन दूरगामी स्वरूपाचे असल्याने मूल्यांकण सहजशक्य होत नाही. मूल्यांचे रोपन होण्यासाठी पोषक वातावरणाची आवश्यकता असते. हे वातावरण तात्पुरते न राहता अधिक काळपर्यंत टिकून राहणे महत्वाचे आहे. मूल्यांचे मूल्यांकण काटेकोरपणे करता येत नाही. व्यक्तींच्या वर्तनावर अनेक बाहय आणि आंतरिक

घटकांचा परिणाम होत असतो. यातून त्याचे वर्तन दिसून येते. एका प्रसंगी व्यक्ती सत्याचे आचरण करील पण कांही वेळेला ती असत्याचे आश्रय घेईल, अशी व्यक्ती सत्यवचनी म्हणावी का ? या उदाहरणावरून मूल्यांकन अवघड आहे हे सिध्द होते.

## ५.१० समारोप :

प्रस्तुत प्रकरणात अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादावरून माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण केलेले आहे. तसेच मुलाखती व मूल्याधिष्ठीत पाठांचे निरीक्षण करून अर्थनिर्वचन केले आहे.

हे वर्गीकरण विश्लेषण व अन्वयार्थ पुढील मुद्यांच्या संदर्भात केलेले आहे.

(१) अध्यापकांची सर्वसाधारण माहिती.

(२) पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये व त्यांचे संक्रमण

(३) मूल्यसंक्रमणाचे मार्ग

(४) मूल्यसंक्रमणातील अडचणी

(५) मूल्यसंक्रमणासाठी आयोजिलेले वेगवेगळे उपक्रम.
(अभ्यासपूरक व अभ्यासेतर)

(६) मूल्यसंदर्भात अध्यापकांचे प्रशिक्षण

(७) मूल्यशिक्षणा बाबत कृतिसत्रे

(८) मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध.

(९) मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन

(१०) प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अन्य माहिती.

पुढील प्रकरण ६ मध्ये मूल्यशिक्षणाचा लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत आणि त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

=0=0=0=0=0=